रायगड, सोमवार दि. २८ ऑगस्ट २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

आरोग्य केंद्रात मनुष्यबळाचा तुटवडा

पान ३ वर

बॅडमिंटन कोर्टचे उद्घाटन गुरुवारी होणार

पान ८ वर

आजचा अग्रलेख

मोदी रडणार नाहीत

वेधक

प्रज्ञान रोव्हरचे चंद्रावर भ्रमण

नवी दिल्ली : प्रज्ञान रोव्हर चंद्रावर भ्रमण करत असून आतापर्यंत सर्व इस्रोच्या प्लानप्रमाणेच घडत आहे. चांद्रयान-३ मिशनचे दोन उद्दिष्ट पूर्ण झाले आहेत. तर तिसरे उद्दीष्ट लवकरच पूर्ण होण्यास आम्हाला यश येणार आहे. १४ दिवस हे चांद्रमोहिमेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्रज्ञान रोव्हरने आत्तापर्यंत भरपूर डेटा गोळा केला आहे. अशी माहिती इस्रोचे प्रमुख एस.सोमनाथ यांनी दिली आहे.

गणेशोत्सव संपेपर्यंत अवजड वाहतूक बंद

मुंबई : गोवा महामार्गावरील अवजड वाहतूक गणेशोत्सव संपेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.तसे आदेश सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी जारी केलेले आहेत. महामार्गाची झालेली दुरवस्था तसेच सुरु असलेल्या काँक्रिटीकरणामुळे वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रविवारी २७ ऑगस्टपासून गणेशोत्सव संपेपर्यंत अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली जाणार आहे.

मुंबईतील हॉटेलला आग; तिघांचा मृत्यू

मुंबई : मुंबईतल्या सांताक्रूझ भागात भीषण आगीची घटना घडली आहे. या घटनेमध्ये तिघांचा मृत्यू झाला. अग्निशमन यंत्रणेने आगीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला आणि आठ जणांना वाचवलं. तीन जखमींना व्हीएन देसाई रुग्णालयात हलवण्यात आले होते. तिघांनाही मृत घोषित करण्यात आले आहे. सदरील आग गॅलेक्सी हॉटेलमधील दुसऱ्या मजल्यावरील खोली क्रमांक २०४ मध्ये लागली होती.

वनविभागाचे पेपरही आरोपीच्या मोबाईलमध्ये

नाशिक : तलाठी भरती परीक्षा घोटाळ्यातील मुख्य संशयित गणेश गुसिंगे याच्या मोबाईलमध्ये वनविभागाच्या प्रश्नपत्रिका देखील सापडल्या. इतर परीक्षेत देखील गैरव्यवहार केल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाकडून घेण्यात आलेल्या भरती परीक्षेच्या जाहीर झालेल्या यादीत १३८ गुण मिळाल्याचं दिसून आलं. गणेश गुसिंगे हाच पिंपरी चिंचवड पोलिस भरती आणि म्हाडाच्या पेपरफुटीमध्येही आरोपी आहे. त्यामुळे नुकत्याच गुणवत्ता यादीत जाहीर झालेल्या व परीक्षेची देखील चौकशी होणार आहे.

राज्यभर सभांचा धडाका

आरोप आणि हल्लाबोल

महाराष्ट्रात रविवार गाजला तो विविध राजकीय नेत्यांच्या जाहीर सभांनी. हिंगोलीमध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची निर्धार सभा तर रायगडात कोलाड येथे महामार्गाच्या दुरवस्थेवरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची सभा पार पडली. या दोन्ही सभांमधून ठाकरे बंधूंनी राज्यकर्त्यांना आपले लक्ष्य केले. तर बीडमध्ये झालेल्या उत्तरसभेतून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांनी केलेल्या आरोपांना चोख प्रत्युत्तर दिले.एकूणच रविवार दिवस सभांचा अन आरोपांचा असाच ठरला.

'शासन आपल्या दारी, थापा मारतो लयभारी'

। हिंगोली । प्रतिनिधी ।

हिंगोली येथील आपल्या निर्धार सभेतून उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. 'शासन आपल्या दारी, थापा मारतो लय भारी' अशा खोचक शब्दात उद्धव ठाकरेंनी सरकारवर टीकास्त्र सोडले. उद्धव ठाकरे हिंगोली येथील सभेत बोलत असून, आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी सत्तधारी पक्षावर निशाणा साधला. सरकार आपल्या दारी म्हणत असून, योजना फक्त कागदावरी असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

'हे कसले हिंदू, याला नामर्द म्हणतात'

सापाला पायाखाली ठेचा

काही जणांना अपेक्षा असेल मी गद्दारांवर बोलेन, पण मी गद्दारांवर वेळ घालवणार नाही. मी तुम्हाला भेटण्यासाठी आलो असून, त्यावरच बोलणार आहे. मागे नागपंचमी झाली. आपण या गद्दाराला दूध पाजले पण त्याने पलटून चावण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अशा सापांना पायाखाली ठेचलं पाहिजे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांच्यावर निशाणा साधला.

पान २ वर

'कोकणी माणसा जागा हो : राज ठाकरे

। रोहा । प्रतिनिधी ।

मुंबई- गोवा महामार्गाच्या दुरवस्थेला आतापर्यंत चे सर्व चराज्यकर्ते जबाबदार असून,या राज्यकर्त्यांना रस्त्यावर आणायचे असेल तर कोकणी माणसाने भावनिक न होता विकासाला प्राधान्य देणाऱ्यांना सत्तेवर बसविले पाहिजे, यासाठी कोकणी माणसा जागा हो, असे भावनिक आवाहन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी कोलाड येथे केले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कोकण जागर यात्रा काढली आहे. या यात्रेत राज ठाकरे, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे सहभागी झाल्या होत्या. तर, राज ठाकरे यांनी कोलाड येथून कोकणी बांधवांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कोकणातील

> मी हात जोडून कोकणी बांधवांना विनंती करतो की जमिनी विकू नका. हा रस्ता असा (अपूर्ण) ठेवण्यामागचं सर्वांत मोठं कारण अत्यंत चिरीमिरीमध्ये जमिनी विकत मिळत आहेत. अत्यंत मामुली किंमतीत जमिनी विकत घेतली जात आहेत. जेव्हा हा रस्ता पूर्ण होईल, तेव्हा शंभरपट किंमतीत तुमच्याच जमिनी व्यापाऱ्यांना विकल्या जाणार आहेत. पैसे ते कमवणार, आणि तुम्ही तसेच राहणार,
> - राज ठाकरे, मनसे अध्यक्ष

पान २ वर

भुजबळ, मुंडेचे पवारांना आव्हान

। बीड । प्रतिनिधी ।

उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे रविवारी बीडमध्ये जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. यावेळी बोलताना छगन भुजबळ यांनी प्रथमच शरद पवारांवर हल्लाबोल केला.

राज्यात कोणाकोणाची माफी मागत फिरणार असा सवाल करतानाच२०१९ मध्ये स्वतःच्याच खेळाडूंना गुगली टाकून बाद करण्याचे काम पवार साहेबांनी केले होते, असा घणाघात त्यांनी केला. तर धनंजय मुंडे यांनी पवार साहेबांनी बीड जिल्ह्याल्याला काय दिले असा सवाल विचारला. जंगी मिरवणूकही काढण्यात आली. गेल्याच आठवड्यात याच बीडमध्ये शरद पवारांचीही जाहीर सभा झाली होती. त्या सभेला उत्तरसभा म्हणून अजित पवारांची सभा आयोजित करण्यात आली होती.

महिला सक्षम होणे ही काळाची गरज : चित्रलेखा पाटील

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महिला सक्षम होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले. पक्षाच्या माध्यमातून 'मी होणार स्वावलंबी' या कार्यक्रमाद्वारे महिलांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण व गुणगौरव सोहळा अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे रविवारी (२७ ऑगस्ट) रोजी आयोजित करण्यात आला. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

यावेळी अलिबाग तालुका शेकाप महिला आघाडी प्रमुख प्रिती पाटील, मुळेच्या सरपंच रोहिणी पाटील, पेझारी सरपंच प्राजक्ता पाटील, चेंढरे सरपंच स्वाती पाटील, रविंद्र म्हात्रे, वाघोडे सरपंच कृष्णा जाधव, सदस्य सुमित माने, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका सुषमा पाटील, संजना कीर, वृषाली पाटील, प्रिया वेलणकर, निनाद वारगे, अवधूत पाटील आदी मान्यवरांसह अलिबाग तालुक्यातील शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्या, प्रशिक्षणार्थी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पूर्वी महिलांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. त्यांना घरातून बाहेर पडण्याची मुभा नव्हती. सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रवाहाच्या विरोधात जाऊन महिलांना शिक्षणाचा हक्क दिला. शिक्षणामुळे एक वेगळे परिवर्तन झाले. शेतकरी कामगार पक्ष याच विचारधारेतून तयार झालेला पक्ष आहे. महिला स्वावलंबी बनल्या पाहिजे हा दृष्टीकोन ठेवून वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहे.
> -चित्रलेखा पाटील, शेकाप नेत्या

यावेळी मार्गदर्शन करताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांनी महिला

पान २ वर

महिलांचा सन्मान

शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील मुली, महिलांसाठी ब्युटी पार्लरचा कोर्स घेतला होता. हा कोर्स पुर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्र व पार्लरचे कीट वितरीत करण्यात आले. तसेच पुन्हा नव्याने ब्युटी पार्लरच्या कोर्सचा शुभारंभ करण्यात आला. त्यामध्ये सहभाग घेतलेल्या १२ महिलांचा सत्कार करण्यात आला. डिजीटल मार्केटींगचे प्रशिक्षण पुर्ण झालेल्या १६ महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले. गावांतील महिला बचत गटांना रोजगाराचे दालन खुले व्हावे यासाठी नवेदर बेली व घसवड येथील महिलांसाठी स्वयंपाक भांडी वाटप करण्यात आली. वाघोडे येथील चंदरवाडी येथील जागृती नाईक या आदिवासी मुलीला व्यवसाय सुरु करण्यासाठी झेरॉक्स मशीन देण्यात आली. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

मनसेची जागर यात्रेने महामार्गावर कोंडी

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

मुंबई - गोवा महामार्गचे रखडलेले काम सुरु व्हावे, कोकणातील रस्ते खड्डे मुक्त व्हावेत यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने कोकण जागर यात्रा रविवारी २७ ऑगस्ट रोजी पनवेलमधील पळस्पे फाटा येथून सुरू करण्यात आली. यावेळी मनसे नेते अमित ठाकरे यांनी सरकारचा निषेध करीत सदरचे आंदोलन हे शांततेत असून पुढील आंदोलने उग्र होतील. असा इशारा देखील दिला.

या आंदोलनात शर्मिला ठाकरे यांनी देखील १६किमी अंतर पायी चालत पार पाडले.

मात्र रखडलेल्या या मार्गासाठी केलेल्या आंदोलनामुळे यावेळी झालेल्या वाहतूक कोंडीने प्रवासी व वाहनचालकांची

पान २ वर

'अजितदादांच्या नेतृत्वाखाली जिंकू'

। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।

आम्हाला टी-ट्वेंटी आणि ५० षटकांचे सामने जिंकायचे असून,अजितदादांच्या नेतृत्वाखाली आम्ही तशी तयारी केली असल्याचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी जाहीर केले.

सुनील तटकरे यांनी छत्रपती संभाजीगनरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला.यावेळी त्यांनी शरद पवारांवरही अप्रत्यक्षपणे निशाना साधला. शरद पवार यांच्या वक्तव्यासंदर्भात बोलताना तटकरे यांनी मी सुद्धा क्रिकेटमधला खेळाडू आहे पण या संदर्भात मी काही बोलणार नाही. अचूक टप्प्यावरच्या चेंडूला देखील काही काही वेळेला षटकार बसू शकतो. आम्ही केवळ निर्धाव ओवर काढण्यासाठी मैदानात उतरलो नाही. मार्च एप्रिल मध्ये येणारी टी-ट्वेंटी आम्हाला जिंकायची आहे. याशिवाय ५० षटकाचे सामने आम्हाला ऑक्टोबर मध्ये जिंकायचे आहेत, असं सुनील तटकरे म्हणाले. कसोटीप्रमाणे पुढच्या पाच वर्षासाठी काम आम्हाला चालू ठेवायचे आहे. या तिन्ही पद्धतीच्या खेळासाठी आम्ही तयार झालेलो आहोत, असे तटकरे म्हणाले आहेत.

उद्धव ठाकरे त्यांचा फुटलेला पक्ष अधिक फुटू नये, यासाठी प्रयत्न करत आहेत. आम्ही जनतेमध्ये जातो आहोत.

पान २ वर

हलक्या पावसाची राज्यात शक्यता

। पुणे । प्रतिनिधी ।

गेल्या दोन आठवड्यात पावसाने दांडी मारल्यानंतर पुन्हा पावसाचा हलक्या सरी बरसायला सुरुवात झाली आहे. असाच पाऊस येणाऱ्या पाच ते सहा दिवस पडणार आहे. पश्चिम महाराष्ट्र म्हणजे अहमदनगर, पुणे, पुणे जिल्हा, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या सहा जिल्ह्यात ३१ ऑगस्टपर्यंत अत्यल्प पाऊस म्हणजे ०५ ते १.५ मीमी पाऊस असणार आहे. तसेच, कोकण भागात जेसे की सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या पाच जिल्ह्यातील पावसाची स्तिथी अतिशय कमी असणार आहे. ०१ मिलिमीटर तर काही दिवशी १५ मिलिमीटर पर्यंत पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आहे. बीड, औरंगाबाद, जालना, परभणी मध्ये पावसाचं प्रमाण अत्यल्प राहणार आहे.

श्रीवर्धन किनारी चरसची पिशवी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन येथील खालचा जीवना परिसरातील स्मशानभूमीच्या जवळ व सुबहान बीच रिसॉर्टच्या काही अंतरावर चरस या अंमली पदार्थाची पिशवी आढळून आली. सागरी गस्तीचे पोलीस शिपाई दर्शन गायकवाड समुद्रकिनाऱ्यावरती फिरत असताना त्यांना एक अज्ञात पिशवी आढळून आली.

याबाबतची माहिती त्यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये दिल्यानंतर पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे व उपविभागीय अधिकारी प्रशांत स्वामी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. सदर पिशवी ही समुद्राच्या पाण्याबरोबर किनाऱ्यालगत वाहून आल्याचे दिसून आले. तसेच ही पिशवी फाटलेली असल्याने त्याच्या आतील भागामध्ये एकूण नऊ प्लास्टिक पिशव्या आढळून आल्या. सदर प्लास्टिक पिशव्यांमध्ये चरस नावाचा अमली पदार्थ

पान २ वर

सुखदेवे साहेब, अजून किती अपघात हवेत

राकेश लोहार

। चौल ।

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे रविवारी २७ ऑगस्ट रोजी अलिबाग-बेलकडे रस्त्यावर अपघात झाला आहे. दरम्यान, या रस्त्यावरील

अपघात झाल्यास जबाबदार कोण?

मोऱ्यांचे कठडे गायब, साईडपट्टी खचली; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

- **आतातरी अलिबाग-बेलकडे रस्त्याची दुरुस्ती करा!**
- **मोऱ्यांचे कठडे जमीनदोस्त, साईडपट्टी खचली**

असणाऱ्या मोऱ्यांवरील संरक्षक कठडे जमीनदोस्त झाले आहेत, येथील रस्त्याची साईडपट्टी खचली आहे, याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधूनसुद्धा कोणतीही कार्यवाही झाली नाही. या कामाला मुहूर्त कधी लागणार असा सवाल उपस्थित केला जात असून, याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देणार का, असे म्हणायची वेळ आली आहे.

पान २ वर

...तर बांधकाम विभाग जबाबदार

याठिकाणी कोणताही अपघात झाल्यास त्यास सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे. जाणूनबुजून या कामाकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रो-रो सेवेमुळे जलवाहतुकीला चालन

रेवस जेट्टीच्या कामाला सुरुवात

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मांडवा ते भाऊचा धक्का या यशस्वी रो-रो सेवेनंतर रेवस ते करंजा रो-रो सेवा लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. गेल्या सात महिन्यांपासून रेवस येथील प्रकल्पाचे काम थांबले होते. अखेर या कामाला मुहूर्त मिळाला असून, गेल्या आठ दिवसांपासून पुन्हा नव्याने कामाला सुरुवात झाली असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने दिली आहे.

पान २ वर

ही आहेत कामे

सागरमाला योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ५० टक्के व राज्य शासनाकडून ५० टक्के हिस्सा असणार आहे. या प्रकल्पाला १७ ऑक्टोबर २०१८ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली होती. रेवस येथील जेट्टी व अद्ययावत अशी टर्मिनल इमारत असणार आहे. या इमारतीमध्ये बुकिंग सेंटर, कँटीन, प्रतिक्षालय व अन्य सुविधा प्रवाशांसाठी असणार आहे. त्यात जेट्टीची लांबी २०० मीटर, जेट्टीची रुंदी १० मीटर, जेट्टीकडे जाणारे सिमेंट काँक्रिटीकरण, ४० प्रवासी बसतील असे प्रतिक्षालय, तिकीट घर रो-रो जेट्टी बांधणे, परिसरात विद्युतीकरणाचे काम करणे.

शेकापचा पाठपुरावा

शेकापच्या पाठपुराव्यामुळे रेवस-करंजा रो-रो प्रकल्प मार्गी लागणार आहे. यासंदर्भात माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांनी त्यांच्या कार्यकाळात या प्रश्नाचा पाठपुरावा केला होता. त्यानंतर आमदार जयंत पाटील यांनी सातत्याने या प्रश्नाला वाचा फोडत आहेत. मी आमदार असताना, रो-रो प्रकल्प सरकारने सुरु करावा यासाठी पाठपुरावा केला होता. माझ्या कारकीर्दीत हा प्रकल्प मंजूर करून घेतला होता. तो प्रकल्प आता मार्गी लागणार आहे, हे शेकापचे यश आहे, असे माजी आमदार पंडित पाटील यांनी सांगितले.

माथाडी कामगारापुढे कंपनी प्रशासन नमले

बेमुदत उपोषण स्थगित

। खोपोली । वार्ताहर ।

तांबाटी येथील ओके प्रिंट अँण्ड पॅक कंपनीतील माथाडी कामगारांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणाची दखल घेत कंपनी व्यवस्थापनाने नमते घेतले. ५० किलो पेक्षा जास्तीचे वजन उचलवणे अमानवीय आहे. कामगारांना कंपनीच्या आवारामध्ये बसण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच अत्यावश्यक सेवा या कंपनी व्यवस्थापनाच्या मुजोरपणाच्या विरोधात माथाडी कामगारांनी उपोषण कंपनीच्या गेट समोर सुरू केले होते.

तर येथील कामगारांच्या बाजूने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महाराष्ट्र जनरल श्रमिक कामगार संघ ठाम राहिली असता अखेर कंपनी प्रशासनाने नरमाईची भूमिका घेत सर्व मागणी पूर्ण केल्याने उपोषणाला अखेर स्थगिती देण्यात आल्याने कामगारांनी आनंद व्यक्त करत कामगार एकजुटीचा विजय असो अशा घोषणा देत समाधान व्यक्त केले.

यावेळी नितीन सावंत, कैलास म्हात्रे, गौरव नालीदे, संजय गायकवाड, पियुश नालकाडे, नंदकिशोर मयेकर, विलास कदम, सुप्रीम सुर्वे, अंकुश भागित, जयानद सावंत, चिटणीस कैलास फराट, कोकण विभाग अध्यक्ष समीर चव्हाण, संतोष देशमुख, निखिल पाटील, महेश पाटील, अशोक मराजगे, संगम जाधव, प्रणाल लाले, अंकुर बामणे, विशाल म्हामुनकर, कैलास पाटील आदी प्रमुखासह खालापूर तालुक्यातील नागरिक व कामगार उपस्थित होते.

प्रवीण फराट, प्रतीक फराट, अजित ठोंबरे, जयेश मगर, सुरेश भडकले, यशवत मुंडे, राजेश पाटील हे सात कामगार उपोषणासाठी बसले आहे.

खालापूरमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

खोपोली : कोकणातील शेतकरी समृद्ध होण्यासाठी एकत्र यावे यासाठी कोकण क्लबचे संस्थापक अध्यक्ष संजय यादवराव यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या प्रयत्नाला कोकणातील शेतकरी प्रतिसाद देतांना दिसत आहे. खालापूर तालुक्यातील तांबाटी येथे संपन्न झालेल्या सभेला शेकडो शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली. यादवराव यांच्या समवेत गणेश भगत यांनी मार्गदर्शन केले. तालुक्यातील वरदविनायक शेतकरी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी, परिसरातील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

कुंभिवलीमध्ये परप्रांतीय मतदारांचा समावेश

। खोपोली । वार्ताहर ।

कुंभिवली ग्रामपंचायत हद्दीतील प्रभागात १३७ नाव वाढवण्यात आली आहेत. यामध्ये परप्रांतीयांचा समावेश करण्यात आल्याने ती नावे कमी करावीत,अशी मागणी केतन महाडिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी आक्रामक पवित्रा घेत निवडणुकीवरच बहिष्कार टाकण्याचा इशारा दिल्याने निवडणुकीपूर्वीच कुंभिवली ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील वातावरण चांगलेच तापले आहे.

महाडिक यांनी अर्ज केला तेव्हा ७९ नावे अधिक होती. ही नावं कमी होण्याऐवजी वाढून १३७ झाली आहेत. विशेष म्हणजे यामध्ये परप्रांतीय नावांचा भरणा अधिक झाला आहे.

या प्रभागात आदिवासी, ओबीसी, मागासवर्गीय मतदार असताना परप्रांतीयांची नावे आली कुठून असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

म्हसळ्यात स्वच्छता अभियासास प्रतिसाद

। म्हसळा । वार्ताहर ।

सुंदर म्हसळा, स्वच्छ म्हसळा मोहिमेंतर्गत शहरात शनिवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दिघी नाका ते स्टेट बँक ऑफ इंडिया परिस नगर पंचायत कार्यालय ते पाभरे फाटा येथपर्यंतच्या स्वच्छता मोहिमेत रस्ता व गटार सफाई, कीटकनाशक औषध फवारणी, अनधिकृरित्या लावण्यात आलेले नावफलक व पोस्टर्स हटविण्यात आले. अतिरिक्त वाढलेली वेळी वृक्षछाटणी, गवत काढणी, अतिक्रमण हटविण्यात आले. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले आणि शेवटी पर्यावरणपूरक झाडे लागवड करण्यात आली. स्वच्छता मोहिमेत मुख्याधिकारी विराज लबडे, नगराध्यक्ष अकमल कादीरी, प्रभागातील नगरसेवक, नगरपंचायत लेखा कर्मचारी, सफाई कर्मचारी, समाजसेवक यांच्यासह अन्य ६० जणांनी सहभाग घेतला होता.

पिरकटवाडीतील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद शाळा पिरकटवाडी येथ लोधिवली सरपंच पुजा तिन तवले यांच्या सहकार्यातून इनसव्हील क्लब पुणे यांच्यावतीने शैक्षणिक आणि जीवनाश्यक वस्तुंचे वाटप करण्यात आले.

ब्रिजलाल शहा आणि ललिता ओसवा यांच्यावतीने छत्र्या आणि ब्लँकेट, शैक्षणिक साहित्य, शैक्षणिक खेळणी,

विविध प्रकारचे खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी शाळाप्रमुख यशवंत बिरादार, संतोष खैरे, सचिन नवले, बबन दावभट यांनी मदत केली. केंद्रीयप्रमुख गजानन साळुंखे, मोहन दळवी यांचे मार्गदर्शन लाभले. जितेंद्र ठाकूर यांनी आभार मानले.

जय भारत ग्रामसंघाचे स्नेहसंमेलन

। पाली/बेणस । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील गोमाशी येथे जय भारत ग्रामसंघाचे द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमासाठी गोमाशी ग्रामपंचायतीमधील दहा बचत गटातील महिला एकत्र येऊन जय भारत ग्रामसंघाला दोन वर्षे पूर्ण झाले म्हणून केक कापून आपला आनंदोत्सव साजरा केला. तसेच या कार्यक्रमांतर्गत वीरेश्वर महिला बचत गटाला वीस वर्षे पूर्ण झाली म्हणून त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी सरपंच भूषण सुतार, प्रभाग समन्वयक अनुराधा

गायकवाड, दीप्ती उफाले, उर्मिला मगर, प्राची यादव, सानिका वालज, शर्वरी जंगम तसेच ग्रामपंचायत गोमाशीमधील सर्व बचत गटांचे अध्यक्ष, सदस्य महिला आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन दिपाली खैरे यांनी, तर आभार प्रदर्शन अश्विनी जंगम यांनी केले.

डॉ. सलोनी पाटील हिचे यश

। आगरदांडा । वार्ताहर ।

जंजिरा मेडिकल असोसिएशन चे अध्यक्ष डॉ संजय पाटील यांची कन्या सलोनी पाटील हिने वैद्यकीय परीक्षेत सुयश संपादित केले.तिने फिलिपिन्स येथून एमबीबीएस शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर भारतातील नॅशनल मेडिकल कॉन्सिलतर्फे घेण्यात येणाऱ्या फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएशन एक्झामिनेशन परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

पोलादपूरमध्ये सर्व्हिसरोडवर लालमातीचे ढिगारे

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूरमध्ये पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवर लालमातीचे ढिगारे कोसळत असून तेथेदेखील पूर्वेकडील सर्व्हिसरोडप्रमाणे काँक्रीटची संरक्षक भिंत उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

एस.टी.स्थानकाच्या कंपाऊंडच्या जाळीपासून ४५ मीटरचे भुसंपादन करण्यात आल्यानंतर रस्ता दुभाजकासाठी तसेच फूटपाथसाठी जागा व्यापली जाऊ नये, यासाठी अंडरपास महामार्ग नेताना केवळ पाऊण फूट रूंदीचे रस्ता दुभाजक अंडरपास महामार्गातून नेण्यात आले आहेत. पूर्वेकडील सर्व्हिसरोडवर साधारणपणे एक मीटर रूंदीचे फूटपाथ आणि अंडरग्राऊंड गटाराचे बांधकाम करण्यात आले

असताना पश्चिमेकडील सर्व्हिसरोडला मात्र काही ठिकाणी अडीच फूट उंच आणि एक मीटर रूंद तर काही ठिकाणी केवळ एक फूट उंच आणि दीड फूट रूंदीचे फूटपाथ व अंडरग्राऊंड गटार बांधण्यात आली आहेत.

विद्यामंदिर पोलादपूरच्या जुन्या इमारतीलगतच्या डोंगरातून लालमातीचे ढिगारे कोसळू नयेत यासाठी आधीपासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सुमारे २५ फूट उंचीची तसेच ४० मीटर लांबीची काँक्रीटची संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे. यामुळे याठिकाणाहून सर्व्हिसरोडवर लालमातीचे ढिगारे कोसळण्याची शक्यता कायमचीच नष्ट झाली असून या भिंतीच्या समोरील पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवर मात्र लालमातीचे ढिगारे कोसळण्यास सुरूवात होऊनही याठिकाणच्या भुसंपादित व्यक्तींचे चोचले पुरविण्याचे काम 'एलएँण्डटी' या ठेकेदार कंपनीकडून होत नसल्याने अर्धवट तोडण्यात आलेल्या इमारतींखालील जमिनीतून लालमातीचा ढिगारा कोसळून पश्चिमेकडील सर्व्हिसरोडवर आल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर शहराची मूळरचना चौपदरीकरणामुळे पूर्वेकडील मूळ पोलादपूर आणि पश्चिमेकडील नव्याने विस्तारित होणारे पोलादपूर अशी दुभागली गेली असून पश्चिमेकडील लोकवस्तीसाठी आता त्याभागातच किराणा मालाची दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, ज्वेलर्स आणि सलून तसेच औषधाची दुकाने, शाळा अशा प्रकारचा विकास घडून आला आहे.

अल्पवयीन मुलीकडून मोबाईल खरेदीसाठी चोरी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

चोळईतील फार्महाऊसमध्ये घरकाम करणाऱ्या पोलादपूर शहरातील महिलेच्या मुलीने चोरलेल्या रक्कमेसह मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून याप्रकरणी एका अल्पवयीन तरूणीला आरोपी करण्यात आले आहे. चोळई गावातील डोंगरावर असलेल्या संतोष मेढेकर यांच्या फार्महाऊसवर घरकामगार महिलेच्या अल्पवयीन मुलीने घरातील बंद लाकडी कपाट उघडून स्वत:च्या फायद्याकरीता ४६ हजार ७५० रूपये रोख रक्कम चोरल्याची माहिती फिर्यादी दीपक दत्ताराम गोठणकर यांनी दिली.

याप्रकरणी पोलादपूर पोलीसांनी तातडीने तपास सुरू केला असता दुसऱ्याच दिवशी पोलादपूर बाजारपेठेमध्ये राहणाऱ्या घरकामगार महिलेच्या विधीसंरक्षित बालक असलेल्या १७ वर्षे ८ महिने वयाच्या या अल्पवयीन तरूणीकडून ५०० रूपयांच्या ९३ पैकी ६८ नोटा, २०० रूपयांची १ व ५० रूपयांची १ नोट असा एकूण ३४ हजार २५० रूपयांच्या नोटा तसेच विवो कंपनीचा १२ हजार ५०० रूपये किंमतीचा वाय १६ सिरीजचा मोबाईल हस्तगत करण्यात आला.

पान १ वरून

महिलांनी सक्षम राहणे काळाची गरज : चित्रलेखा पाटील

म्हणून समाजात, राजकारणात स्वतःची वेगळी ओळख केली आहे. विधानसभेत एक वेगळा दबदबा त्यांचा राहिला आहे. त्यांनी पक्षाची आन, बाण व शान राखली आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक महिलांनी काम केले पाहिजे,अश अपेक्षाही त्यानी यावेळी व्यक्त केली.

शेकाप हा कष्टकरी, शेतकरी, गोरगरीब तसेच महिलांचा पक्ष आहे. गावे,वाड्यांमध्ये राहणार्या मुली शिकल्या पाहिजे ही भूमिका ठेवून २५ हजार मुलींसाठी सायकली वितरीत करण्यात आल्या आहेत. मुलींच्या स्वरक्षणासाठी स्वसंरक्षणाचे धडे दिले. त्याचाच एक भाग म्हणून गावांतील महिलांना रोजगाराचे साधन खुले व्हावे यासाठी ब्युटी पार्लरचे मोफत प्रशिक्षण दिले असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. आज अनेक मुली, महिला हे प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभ्या आहेत काही महिलांना स्वयंपाकाची भांडी वाटप करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी दिली तसेच झेरॉक्स मशिन देण्यात आली असल्याचे त्या म्हणाला. महिला शिकल्या पाहिजे, महिलांचा राजकिय, सामाजिक व आर्थिक विकास झाला पाहिजे या दृष्टीने शेकापच्या माध्यमातून आपण वेगवेगळे उपक्रम राबवित आहोत. महिलांनी मानसिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे.अशी अपेक्षाही चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केली.

सध्या डिजीटलचे युग आहे. सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. आपल्या लहान मोठ्या व्यवसायाला उभारी देण्यासाठी या सोशल मिडीयाचा वापर करणे गरजेचे आहे. अलिबागची एक वेगळी ओळख यातून निर्माण व्हावी हीच एक इच्छा आहे. महिला जेव्हा स्वतःच्या पायावर उभी राहते. त्यावेळी तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो. हे कायमच प्रत्येकाने लक्षात ठेवून प्रत्येक महिलेने स्वावलंबी बनले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्या पाहिजे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

'शासन आपल्या दारी, थापा मारतो लयभारी'

सरकारवर आणि भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, डबल इंजिन सरकार आणि आता त्यात अजितदादांचा एक डबा लागला आहे. अजून किती डबे लागणार आहेत? मालगाडी होतेय यांची. तुमच्या पक्षात कर्तृत्व नाही? तुम्हाला नेते माझे लागतात, वडील माझे लागतात, पक्ष फोडला, पक्ष सोडला वडील माझे वापरायचे. का तुमच्या दिल्लीतील वडिलांकडे मते मागायची हिंमत राहिली नाही? चोरणार माझे वडील, इतर पक्षातील नेते चोरणार आणि म्हणणार आम्ही हिंदू आहोत. अरे कसले हिंदू, याला नामर्द म्हणतात. ही नामर्दांगी आहे.

टरबूज असा उल्लेख

हिंगोलीतील निर्धार सभेत उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जोरदार टीका केला. फडणवीस यांना मी बोलणं सोडलं मागे मी त्यांना कलंक बोललो, त्यांना फडतूस बोललो तर बोभाटा झाला. आता मी त्यांना थापाड्या म्हणणार होतो पण त्यांना आता थापाड्या म्हणत नाही, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली. शिवाय राज्यात दुष्काळ हे आणि देवेंद्र फडणवीस जपानमध्ये आहेत. टरबूजालाही पाणी लागतं, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांचं नाव न घेता टरबूज असा उल्लेख केला.

'कोकणी माणसा जागा हो : राज ठाकरे

जमिनी विकू नका असं सांगतानाच कोकणातील जमिनींचं गणितही विषद केलं.

पदयात्रा सोपा मार्ग

सरकारला जाग आणण्यासाठी पदयात्रा आयोजित केली. पदयात्रा हा सोपा मार्ग असतो. सरकारचं धोरण आहे की पहिल्यांदा हात जोडून जा, ऐकलं नाही तर हात सोडून जा. आज पदयात्रेतून सरकारला काही गोष्टी शांततेत सांगायच्या आहेत, असंही ते म्हणाले. शस्त्रक्रिया झाली नसती तर मीही चाललो असतो. पण आमचा अमित, पक्षाचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, वसंत मोरे, राजू पाटील ही सर्व मंडळी या रस्त्यांवर चालले. काय चाळण झालीय या रस्त्याची. मला या गोष्टीचं आश्चर्य वाटतंय की कोकणी माता भगिनींना गेली अनेकवर्षे खड्डे सहन करावे लागताहेत. तेच तेच आमदार-खासदार निवडून देतात आणि तेच तुमच्या आयुष्याचा खेळखंडोबा करतात. या रस्ते अपघतात किती लोक गेले असतील? रस्त्यावर पडलेले खड्डे भरता येता पण माणसाचं आयुष्य पुन्हा आणता येत नाही, असंही राज ठाकरे म्हणाले.

जमिनींचं गणित समजून घ्या

आपल्याकडे कुंपणच शेत खातंय. आपलेच लोक जाऊन मामुली किंमतीत जमिनी विकत घेऊन व्यापाऱ्यांना करोडो रुपयांना विकताहेत. दळवळण जेव्हा चांगलं होतं, रस्ते चांगले होतात तेव्हा आजूबाजूच्या जमिनींना काय भाव मिळतात हे गणित समजून घ्या. या जमिनी तुमच्या आहेत, त्या तशाच ठेवा. आज ना उद्या रस्ता होईल, रस्ता झाल्यावर त्याची किंमत तुम्हालाच मिळेल. या व्यापाऱ्यांच्या हाताखाली या जमिनी घालू नका. त्यांना काय रट्टे लावायचे ते आम्ही लावू, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी कोकणी बांधवांना साद घातली आहे.

'अजितदादांच्या नेतृत्वाखाली जिंकू'

जनतेची सेवा करण्यासाठी आणि त्याचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि व्यापक प्रमाणामध्ये जनाधार एन डी ए च्या पाठीमाग कसा निर्माण होईल यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचं तटकरे म्हणाले. पावसाळ्याने ओढ दिली असल्यामुळे मराठवाड्यात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. परभणीला येत असताना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी जी बैठक घेतली आहे.

शरद पवारांना अजित पवार यांच्या भेटीच्या संदर्भात दोन्ही नेत्यांनी मत व्यक्त केलेलं आहे. या संदर्भात मी काही बोलणार नाही. दादांच्या नेतृत्वात घेतलेला निर्णय ,त्या निर्णयाशी आम्ही ठाम आहोत. उद्याच्या भविष्यातील निवडणुका अजित पवार यांच्या नेतृत्वात घड्याळाच्या चिन्हावर लढणार आहोत,

सुनील तटकरे, खासदार

संजय राऊत चांगले संपादक आहेत, माझ्या जिल्ह्यातील आहेत. माझा त्यांचा चांगला परिचय आहे. मात्र त्यांचं थोडं मानसिक संतुलन बिघडल्यासारखंच झालं असल्याचं चित्र निर्माण झाल आहे.केवळ रोज वेगवेगळे दावे करणे आणि माध्यमांसमोर जाणं हा एकमेव उद्देश नजरेसमोर ठेवून ते काम करत आहेत. २०१९ ला शब्दप्रयोग होता की खिडकी उघडलं की पाऊस, आणि टीव्ही लावला की राऊत तशी परिस्थिती होती. आता संजय राऊत यांच कुठलंही मत महाराष्ट्रातील जनता गांभीर्याने घेत नाहीत, असं तटकरे म्हणाले.

श्रीवर्धन किनारी चरसची पिशवी

असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. श्रीवर्धन पोलिसांनी घटनास्थळी शासकीय पंच बोलावून सदर अमली पदार्थांच्या पिशवीचा पंचनामा केला आहे. सदर पिशव्यांचे एकूण वजन अंदाजे दहा किलो पाचशे ग्रॅम असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. काही दिवसांपूर्वी दापोली समुद्रकिनाऱ्याच्या परिसरात देखील अशाच प्रकारे अमली पदार्थांच्या पिशव्या सापडल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा सर्व ठिकाणी तपास सुरू होता. पंचनामाच्या वेळी नायब तहसीलदार भुरके हे सुध्दा उपस्थित होते. सदर अमली पदार्थाच्या पिशव्या समुद्रात बोट फुटल्याने पसरल्या गेल्या असाव्यात किंवा सुरक्षा यंत्रणांच्या तपासणीच्या भीतीने समुद्रात फेकून दिल्या गेल्या असाव्यात. असा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी त्या ठिकाणी सापडलेला मुद्देमाल पंचनामा करून ताब्यात घेतला आहे.मात्र समुद्र किनारी अज्ञात पिशवी आढळून आल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली होती. समुद्र किनारी बघ्यांची गर्दी जमली होती.

सुखदेवे साहेब, अजून किती अपघात हवेत

अलिबाग-बेलकडे रस्त्यावर रविवारी (२७ ऑगस्ट) दुपारी १२ वाजताच्या सुमारास डम्परने हुलकावणी दिल्याने (एमएच ४६ बीके ८७३५) ही कार मोरी रस्त्याच्या बाजूला जाऊन खाडीत कोसळली. अपघात एवढा भीषण होता की, त्यात गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. दैव बलवत्तर म्हणून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. चालकासह प्रवासी जखमी झाले आहेत.

अलिबाग-रोहा, अलिबाग-मुरुड हे दोन्ही मार्ग दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. दरम्यान, या मार्गावरील कुरुळ गावाच्या पुढील गिरोबा मंदिराच्या परिसरातील रस्त्याची साईडपट्टी खचली असून, याठिकाणच्या दोन्ही मोऱ्यांचे संरक्षक कठडे जमीनदोस्त झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे.ई. सुखदेवे यांना या रस्त्याच्या स्थितीबाबत पूर्णपणे कल्पना याआधीही देण्यात आली आहे.

दि. २५ मार्च २०२३ रोजी याबाबत त्यांच्याशी संपर्क साधून मोरीवरील संरक्षक कठडे गायब झाले असून, रस्त्याची साईडपट्टीदेखील मोठ्या प्रमाणात खचली आहे, त्यामुळे मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले होते.

त्यावेळी त्यांनी अलिबाग-रोहा रस्त्याचे काम सुरू असून, त्या कामाबरोबरच येथील मोऱ्यांचे संरक्षक कठडे नव्याने बांधण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. परंतु, आपण दिलेल्या आश्वासनांचा त्यांना विसर पडलेला असून, रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष केल्यानेच आज भीषण अपघात झाला आहे. याबाबत स्थानिकांसह वाहनचालकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

आश्वासनाचा विसर

या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत कृषीवलने २६ मार्च २०२३ रोजी वृत्त प्रकाशित करीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे.ई. सुखदेवे यांना कल्पना दिली होती. त्यावेळी त्यांनी अलिबाग-रोहा रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असून, या कामासोबतच मोरीचे कठडे आणि रस्त्याची साईडपट्टी भरण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, ते हवेतच विरले असून, संबंधित कामाबाबत कोणतीही दखल घेतलेली नाही. दरम्यान, याबाबत विचारणा करण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

आनंदावर विरजण नको

आगामी सण-उत्सवाच्या काळात या मार्गावरुन मोठ्या संख्येने चाकरमान्यांच्या वाहनांची वर्दळ वाढणार आहे. याठिकाणी रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. त्यामुळे रस्त्याचा अंदाज येत नाही. अशा वेळी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. तरी, संबंधित विभागाने तात्काळ उपाययोजना करावी.

महामार्गासाठी मनसेची जागर यात्रा

रखडपट्टी झाली. सकाळी सात वाजल्या पासून पळस्पे ते कर्नाळा अभयारण्य मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. अवघ्या ५ ते ६ किमीचे अंतर कापण्यासाठी वाहनांना दीड ते दोन तास लागले. याबरोबरच पेण, नागोठणे येथे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणी मनसे कार्यकर्ते पोलिसांना वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मदत करत होते. नागोठणे वाकण रोडवर आमदार राजू कदम यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासमवेत निदर्शने केली. याबरोबरच पेण, नागोठणे, वाकण, इंदापूर या ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जमले होते. महामार्गाच्या दोन्ही बाजूला मनसेचे झेंडे फडकत होते. शिवाय पदाधिकाऱ्यांचे मोठे छोटे बॅनर सुद्धा मोठ्या प्रमाणात लावण्यात आले होते. अनेकजण रिल्स व व्हिडीओ बनवत होते, तर काही जण आवर्जून फोटो काढत होते. अनेकांनी सोबत फलक आणले होते. कोकणवासियांसाठी, हक्कासाठी हा लढा उभारला गेला आहे. मात्र या आंदोलनात पोलीस यंत्रणा कामाला लागली होती. शिवाय प्रवासी व वाहनचालक यांचा खोळंबा झाला. त्यामुळे या आंदोलनाला यश येऊन लवकर महामार्गाचे काम चांगल्या प्रकारे होवो असे अनेकांचे म्हणणे आहे.

रेवस जेट्टीच्या कामाला सुरुवात

खड्डेमय रस्ते, वाहतूक कोंडीतून पर्यटकांसह प्रवाशांची सुटका करण्यासाठी रेवस ते करंजा रो-रो वरदान ठरणार आहे. केंद्राच्या सागरमाला योजनेंतर्गत रेवस व करंजा या ठिकाणी जेट्टी उभारणीपासून रस्ता, टर्मिनल, पार्किंग सेवा अशा अनेक सुविधा राबविल्या जाणार आहेत.

करंजा येथील जेट्टी, रस्ता, मच्छिमारांसाठी वेगळी जेट्टी, पार्किंग सेवा व इमारतीचे काम मे २०१९ मध्ये पूर्ण झाले. त्यानंतर रेवस जेट्टीच्या कामाला सुरुवात झाली. मात्र, निसर्ग चक्रीवादळासह तौक्ते चक्रीवादळ, लॉकडाऊन अशा अनेक कारणांमुळे या प्रकल्पाचे काम पुढे ढकलण्यात आले. रेवस येथील जेट्टीचे काम तांत्रिक कारणाबरोबरच ठेकेदार आजारी पडल्याने जानेवारीपासून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत रखडले होते.

एक ऑक्टोबर २०२० पासून पुन्हा रेवस येथील कामांना सुरुवात करण्यात आली होती. जेट्टीवर येण्या-जाण्यासाठी काँक्रिट रस्ता तयार करण्यात आला. परंतु, काही तांत्रिक कारणाबरोबरच ठेकेदार आजारी पडल्याने हे काम लांबणीवर गेले. जानेवारीपासून ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रकल्पाचे काम थांबले होते.

अखेर या कामाला पुन्हा मुहूर्त मिळाला आहे. रेवस जेट्टीच्या कामाला सुरुवात झाली असून, या कामाला आता गती मिळण्याची शक्यता आहे. मात्र, या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीमध्ये ५५ लाख रुपयांच्या निधीची वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड विभागाच्या अधिकाऱ्यांकडून नाव न टाकण्याच्या अटीवरून दिली आहे.

जलवाहतुकीचा मार्ग होणार सुखकर

रेवस ते करंजा रस्त्यावरील अंतर ८६ कि.मी. असून, जलमार्गाने तीन किलोमीटर इतके आहे. रेवस ते करंजा रो-रो सेवा सुरु झाल्यास रेवस येथून करंजा येथे जाण्यासाठी प्रवासी व त्यांची वाहने बोटीने नेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे इंधनाची व वेळेची बचत होणार आहे. हा प्रकल्प पर्यावरणपूरक आहे.

रेवस ते करंजामधील जलवाहतुकीचा मार्ग यामुळे अधिक सुखकर होण्यास मदत होणार आहे. करंजा-रेवस ते करंजा हा प्रवास रस्त्यावरून दोन ते तीन तासांचा कालावधी लागतो. करंजा-रेवस रो-रो जलवाहतुकीमुळे वेळेबरोबरच पैशाची बचत होणार आहे. अवघ्या २० मिनिटांत रेवस जेट्टीहून करंजा येथे पोहोचता येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

क्ष व नि

वॉन्टेड दांपत्याला बेड्या

पनवेल : आर्थिक फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल असलेले राजू देशपांडे आणि संगिता देशपांडे हे दांपत्य अखेरीस पोलिसांच्या ताब्यात आले आहे. त्यांना २३ ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २५ ऑगस्टपर्यंत कोठडी बजावली होती. शुक्रवार, दि. २५ ऑगस्ट रोजी हजर केले असता त्यांना आणखी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी बजावली आहे.

कस्टम अधिकाऱ्याची आत्महत्या

पनवेल : न्हावाशेवा येथील जवाहरलाल नेहरु कस्टम हाऊसच्या बॉन्ड सेक्शनमध्ये सुरु असलेल्या भ्रष्ट काराभाराची सीबीआयने तपासणी करुन या विभागातील कस्टम अधिकारी आणि इतरांवर गुन्हा दाखल केला आहे. यानंतर तणावाखाली आलेल्या कस्टमच्या बॉन्ड विभागातील अधीक्षक मयंक सिंग यांनी खारघरमधील तळोजा जेलसमोरील तलावात उडी टाकून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

नदीत आढळला मृतदेह

पनवेल : तालुक्यातील पेठ गावाजवळील नदीत एका युवकाचा मृतदेह आढळून आला असून, यासंदर्भात त्याच्या कुटुंबियांनी दि.२६ ऑगस्ट रोजी त्याला पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती. तन्मय आशिष मानकामे (१४ वर्ष ३ महिने) रा. पेठ गाव असे या मुलाचे नाव आहे. या तक्रारीनंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शोध घेत असताना सदर मुलाचा मृतदेह नदीकाठी रविवारी आढळून आला आहे.

फुटपाथवर आढळला मृतदेह

पनवेल : केदारनाथ कंपनीच्या बाजूस असलेल्या फुटपाथवर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध तुर्भे पोलीस करीत आहेत. या मयत इसमाचे नाव रणजित किसन चव्हाण (६०), उंची अंदाजे पाच फूट पाच इंच, डोक्याचे केस पांढरे, चेहरा उभट, अंगाने सडपातळ असून, अंगात निळ्या रंगाचा फुल शर्ट आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तुर्भे पोलीस ठाणे किंवा सहा. पोलीस निरीक्षक गणेश दळवी यांच्याशी संपर्क साधावा.

अल्पवयीन मुलाचा मृत्यू

पनवेल : तालुक्यातील खारघर येथील पांडवकडा धबधब्यावर खारघर येथील १३ वर्षीय हर्ष मिश्रा आपल्या मित्रांसह वर्षासहलीसाठी चोरवाटेने गेला होता. दरम्यान, पाय घसरुन पडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती खारघर पोलिसांना मिळताच अग्निशामक दलाचे पथक व रेस्क्यू टीम तेथे पोहोचली. त्यांनी अनेक तास शोधमोहीम राबवून मुलाचा मृतदेह शोधून काढला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

एक इंचही जागा देणार नाही

। पेण । प्रतिनिधी ।

जर शासन फसवाफसवी करीत असेल, तर विरार-अलिबाग बहुउद्देशी मार्गिकेसाठी एक इंचही जागा आम्ही शेतकरी देणार नाही. शासन कोणतीच स्पष्ट भूमिका शेतकऱ्यांपुढे मांडत नसून, दरवेळेला काही ना काही नवीन बाब समोर आणून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, असे ठाम मत मांडत जमीन सरकारला देण्यास शेतकऱ्यांनी नकारघंटा वाजवली आहे. आठ गाव शेतकरी संघर्ष समितीची बैठक नुकतीच पेण-गोविर्ले येथे झाली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी आपले मत व्यक्त केले.

गैरसमज नको!

शेतकऱ्यांनी नोटीस इंग्रजीत लावण्याबाबत आपल्या बैठकीमध्ये आक्षेप घेतल्याने भ्रमणध्वनीवरून उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, सदरील नोटीस ही दोन वृत्तपत्रांत दोन भाषेत लावली आहे, त्यामुळे शासनाकडून फसवण्याचे काहीच कारण नाही. तसेच सोमवारपासून शेतकऱ्यांना मराठीत प्रत्यक्ष नोटीस दिली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी गैरसमज करून घेऊ नये.

दरम्यान, या बैठकीत शासन कशा प्रकारे फसवेगिरी करते, याबाबत चर्चा झाली. चर्चेनंतर अंतिम असे ठरले की, ज्या वेळेला विरार-अलिबाग बहुउद्देशी मार्गिका विकास करण्याबाबत अद्यादेश काढण्यात आला, त्यावेळी साधारणतः ९९ मीटर रुंद जमीन संपादन केली जाईल, असे कळवण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात जमीन संपादन करताना १२६ मीटर रुंद जमीन संपादित केली आहे. त्याचप्रमाणे २३ तारखेला जी नोटीस प्रसिद्ध केली, तीदेखील इंग्रजीत केली आहे. ती मराठीत करणे गरजेचे होते; परंतु तसे केले गेले नाही. याचाच अर्थ, शेतकऱ्यांना फसवण्याचा डाव शासनाचा आहे. त्यामुळे शासन जर फसवाफसवी करीत असेल, तर

- **विरार-अलिबाग बहुउद्देशी मार्गिकेला विरोध**
- **आठ गाव शेतकरी संघर्ष समिती आक्रमक**

विरार-अलिबाग बहुउद्देशी मार्गिकेसाठी एक इंच ही जागा आम्ही शेतकरी देणार नाही. शासन कोणतीच स्पष्ट भूमिका शेतकऱ्यांपुढे मांडत नसून, दरवेळेला काही ना काही नवीन बाब समोर आणून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

या बैठकीसाठी परशुराम पाटील, संजय डंगर, प्रकाश मोकल, चंद्रकांत पाटील, गणेश म्हात्रे गुरूजी, ज्ञानेश्वर ठाकूर, मोहन म्हात्रे गुरूजी यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते. आमच्या जमिनीवर प्रकल्प उभारत असताना आम्हाला डावलण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर कदापि खपवून घेतले जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका यावेळी उपस्थितांमधून घेण्यात आली.

आरोग्य केंद्रात मनुष्यबळाचा तुटवडा

नवीन इमारतीच्या उद्घाटनाचा प्रशासनाला विसर

। आंबेत । वार्ताहर ।

म्हसळा तालुक्यातील आंबेत येथे सुमारे पाच कोटी रुपये खर्च करून नव्याने आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा मंत्री आदिती तटकरे यांनी विशेष पाठपुरावा करून हे काम पूर्ण केले. परंतु, आजपर्यंत या दवाखान्याचे उद्घाटन झालेले नसून, यामध्ये राजकीय हेतुपरस्सर हा उद्घाटन सोहळा रखडल्याचे बोललं जातं आहे. तसेच मनुष्यबळाचा तुटवडा असून, महत्त्वाची पदे अद्याप रिक्त आहेत.

आज आंबेत परिसरात असणाऱ्या नाविवाडी विचारेवाडी, संदेरी, आमशेत, खारगाव, तोराडी, म्हाप्रल, लोकरवन, पडवे, कोकरे, दाभोळ, अशा गावांतील हजारो नागरिकांना या सेवेचा लाभ मिळत असून, आंबेत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उपकेंद्र स्तरावर पूर्ण सेवा देण्यात येत आहे. माजी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी तात्काळ या केंद्राला भेट देत आरोग्य तपासणी सुरू करण्याचे आदेश दिल्यानंतर १५ मे २०२३ ला तपासणी आणि इतर सुविधा सुरू करण्यात आल्या, त्यानंतर आतापर्यंत एकूण २२०० च्या आसपास रुग्ण तपासणी केवळ वैद्यकीय

> या इमारतीचे काम १०० टक्के पूर्ण होऊनदेखील अत्याधुनिक सुविधांची वानवा जाणवत आहे. कर्मचाऱ्यांचादेखील तुटवडा असून, नेमकेच कर्मचारी येथे आरोग्य सुविधा सांभाळत आहेत. आरोग्य विभागाने लवकरात लवकर या पदांची नियुक्ती करून ही सेवा सुरळीत सुरू करावी.
> - नाविद भाईजान, सामाजिक कार्यकर्ते

अधिकारी, आरोग्यसेवक, सेविका, सफाई कर्मचारी, स्त्री परिचर यांच्या सहाय्यावर हे केंद्र चालवण्यात येत आहे. वास्तविक पाहता, आंबेत प्राथमिक केंद्र इमारतीचे काम हे १०० टक्के पूर्ण झालेले असताना शासन स्तरावरून अद्यापही आवश्यक मनुष्यबळ उदा. औषध निर्माण अधिकारी, ओपीडी आरोग्य सेविका, शिपाई, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अशी महत्त्वाची पदे न भरता उपकेंद्र कर्मचाऱ्यांच्या जीवावर रुग्ण सेवा अविरत चालू आहे.

सदर इमारतीमध्ये आठवड्यात पिण्याचं पाणी येत असून, ते नियमित येणे गरजेचे आहे. दवाखान्यात लागणारी आरोग्य रुग्णवाहिका आजपर्यंत उपलब्ध नाही. अशी परिस्थिती असताना आरोग्य विभाग अद्याप झोपेतच असल्याचं दिसून येत आहे. लवकरात लवकर या संदर्भातील विषय मार्गी लावण्यात यावा, अशी विनंती स्थानिक नागरिक आणि कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

अधिकाऱ्यांनो, मुख्यालय सोडू नका!

। कर्जत । प्रतिनिधी ।

सीईओंचे पशुसंवर्धन विभागाला पत्राद्वारे आदेश

जिल्हात नव्याने रूजू झालेले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीच डॉ. भरत बास्टेवाड यांनी जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिका-यांनी वरिष्ठांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे आदेश पत्राद्वारे सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

सध्या राज्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढत असून, त्याची झळ रायगड जिल्ह्यालादेखील बसली. या पार्श्वभूमीवर सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या मुख्यालयात राहून सेवा देणे कर्तव्य असून, त्यांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच ग्रामसेवक, सरपंच यांच्याशी संपर्क करून त्यांना रोगाविषयी माहिती देऊन प्रशिक्षण तसेच रोगाबाबत जनजागृती करावी, तसेच गोठा साफसफाई कसा ठेवावा, योग्य वेळी फवारणी करावी, याकरिता शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असेही पत्रात नमूद केले आहे. जे पशुवैद्यकीय अधिकारी मुख्यालयात राहणार नाहीत, त्यांचे घरभाडे बंद करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. बास्टेवाड यांनी पत्रात नमूद केले आहे.

दादांना अभिवादन...

• शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, लोकनेते ड. दत्ता पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी रविवारी अलिबाग येथील शेकाप भवनमध्ये प्रतिमेस अभिवादन केले. शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील, शेकाप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही त्यांना श्रद्धांजली वाहिली. (छायाचित्र : अमोल नाईक)

महिलांच्या स्वावलंबनासाठी उपक्रमातून बळ

। पाताळगंगा । वार्ताहर ।

महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी खालापूर तालुका कृषी खात्याच्या माध्यमातून स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आले. यासाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा तसेच श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोहा यांच्या सहकार्याने नढाळवाडी येथील महिलावर्गास नाचणीचा केक, रवा केक, राजभोग केक व नाचणीची बर्फी, नाचणी व टाकळा चे अप्पे, नाचणी व शेवग्याची पाने वापरून अप्पे, कंटुली चे मंचूरियन, नाचणी व कंटुली वापरून मोमोज, सुरणाचे कटलेट आदी प्रात्यक्षिके करुन, मार्गदर्शन करण्यात आले. अश्विनी फुलारे, हर्षदा दगडे, सायली भगत यांनी विविध पदार्थ बनविण्याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन प्रकल्प संचालक आत्मा यांच्या बाणखेले मॅडम, उपविभागीय कृषी अधिकारी फुलासुंदर आदींनी केले होते.

पूर्णवेळ मुख्याधिकारी कधी?

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरानला गेल्या पाच महिन्यांपासून पूर्णवेळ मुख्याधिकारी नाही आणि त्यामुळे माथेरान शहरात नागरी समस्यांचा सुकाळ दिसून येत आहे. पूर्णवेळ मुख्याधिकारी आणि पालिका प्रशासक नसल्याने नागरी समस्यांचा बोजवारा उडाला असून, शहरातील अनेक रस्ते अर्धवट गवतात झाकले गेले आहेत.दरम्यान, त्या रस्त्यांकडे पालिकेने लक्ष दिले नाही तर मात्र जंगल भागात असलेले काही रस्ते बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

माथेरान शहरात गिरिस्थान नगरपरिषद असून, या नगरपरिषदेत मुदत संपली आहे, त्यामुळे येथे प्रशासकीय राजवट असून, गेल्या मार्च २०२३ मध्ये पूर्णवेळ मुख्याधिकारी यांची पुणे येथे आहे. त्यामुळे माथेरान गिरिस्थन नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्याधिकारी मिळाला नाही. त्यात मुख्याधिकारी यांच्याकडे प्रशासक पदाची जबाबदारीदेखील आहे. अशावेळी दोन्ही अधिकाऱ्यांची पदे ही प्रभारी असल्याने माथेरानमधील प्रशासन मागील पाच महिन्यांत जनतेच्या समस्या सोडविण्यात पालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याचे दिसून आले आहे. मात्र, पावसाळा हा माथेरान गावासाठी अनेक समस्या घेऊन येणार कला असतो. त्यामुळे या कालावधीत पालिकेकडून दैनंदिन कामे वेळच्यावेळी मार्गी लागण्याची अपेक्षा स्थानिकांना आहे. मात्र, यावर्षीच्या पावसाळ्यात माथेरानमधील अनेक रस्ते दगड मातीत हरवले आहेत.

रोह्यातील बांधकामाची जिल्हा प्रशासनाकडून दखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मंगळवारी बैठकीचे आयोजन

रोह्यामध्ये विकासकांच्या फायद्यासाठी शासनाचा निधी वापरण्याचे काम नगरपरिषदेकडून सुरु असल्याचा आरोप माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र दिवेकर यांनी करीत एमआयडीसीच्या जागेत नगरपरिषद स्लॅब टाकत असल्याची तक्रार केली होती. या तक्रारीची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदेश शिर्के यांच्या दालनात २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजता या प्रश्नांवर चर्चा होणार आहे. त्यामुळे दिवेकर यांनी तूर्तात सोमवारी होणारे उपोषण मागे घेतले आहे.

सातमुशी गटाराची जागा एमआयडीसीच्या मालकीची आहे. या जागेशी रोहा नगरपरिषदेचा काहीही संबंध नसताना, विकासकाच्या भल्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी मंजूर करून बेकायदेशीररित्या शासनाच्या निधीचा अपव्य होत आहे. स्लॅबशेजारी तयार होत असलेल्या १४ मजली अनियमित इमारतीसाठी विकासकाच्या फायद्यासाठी निधी वापरण्याचे काम चालू असल्याचा आरोप दिवेकर यांनी केला. नगरपरिषद प्रशासनकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने दिवेकर यांनी अखेर न्यायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेत न्यायासाठी उपोषण करण्याचा इशारा दिला होता. अखेर या तक्रारीची दखल प्रशासनाकडून घेण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशेट्टी यांनी दखल घेत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदेश शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले आहे. जिल्हा प्रशासनाने दखल घेतल्याने दिवेकर यांनी समाधान व्यक्त केले आहे.

चिटफंड घोटाळाप्रकरणी गुंतवणूकदारांचा उद्रेक

। उरण । वार्ताहर ।

चिटफंड घोटाळाप्रकरणी उरण, पनवेलसह इतर तालुक्यांतील हजारो गुंतवणूकदारांची सतीश गावंड व सुप्रिया पाटील यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली आहे. अशा गुंतवणूकदारांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने पैसे मिळवून देण्यासाठी सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते रुपेश पाटील यांनी रविवारी (दि.२७) पिरकोण गावात सभेचे आयोजन केले होते. यावेळी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांमध्ये एकच उद्रेक निर्माण होत असल्याचे चित्र पहावयास मिळाले.

उरण परिसरात चिटफंड योजनेत झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी हजारोंच्या संख्येने भोळ्याभाबड्या लोकांनी अमाप पैसे हे पिरकोण गावातील सतीश गावंड व कोप्रोली गावातील सुप्रिया पाटील या व्यक्तींकडे एंजटच्या मदतीने गुंतवले आहेत. त्यामध्ये गुंतवणूकदारांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाली असून, सदर प्रकरण हे पोलीस यंत्रणेकडून न्याय प्रविष्ट झाले आहे. त्यामुळे गुंतवणूकदार हे सध्या सैरभैर झाले असल्याने अशा गुंतवणूकदारांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीने पैसे मिळवून देण्यासाठी सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा शिंदे गटातील कार्यकर्ते रुपेश पाटील यांनी गुंतवणूकदारांना आवाहन करुन रविवारी (दि. २७) पिरकोण गावात सभेचे आयोजन केले होते. मात्र, या सभेत आर्थिक फसवणूक झालेल्या आणि सैरभैर झालेल्या गुंतवणूकदारांचा उद्रेक निर्माण होत असल्याचे चित्र पहावयास मिळत होते. मात्र, अशा फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना शांत करण्यासाठी उरण पोलीस ठाण्याचे उपपोलीस निरीक्षक जगदीश देवरे, पिरकोण गावातील सामाजिक कार्यकर्ते मुकुंद गावंड, अनिल पाटील, कृष्णा पाटील हे सातत्याने प्रयत्न करत असल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

तळा शहरावर राहणार तिसऱ्या डोळ्याची नजर

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे आता लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. तळा शहरात घडणाऱ्या घटनांवर नजर ठेवण्यासाठी तसेच चोरी, चेन स्नॅचिंग, लूटमार यांसारख्या घटना घडल्यानंतर गुन्हेगारांना पकडणे सोपे व्हावे यासाठी तळा शहरात दहा सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. मात्र, काही महिन्यांच्या कालावधीनंतर यातील बहुतांश सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडून केवळ तीन कॅमेरे सुरू होते.

याबाबत लोकप्रतिनिधी, नागरिक व पत्रकारांकडून वारंवार सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्याची मागणी करण्यात येत असल्याने मुख्याधिकारी माधुरी मडके यांच्याकडून तळा शहरात बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत त्यानुसार काही दिवसांतच शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू होणार असून, यामुळे शहरातील गुन्हेगारी रोखण्यास मदत होणार आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारांचा सन्मान

दहिवली ग्रामपंचायतीकडून कोनशिलेचे अनावरण

। नेरळ । प्रतिनिधी ।

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतलेल्या क्रांतिकारकांचा दहिवली ग्रामपंचायतीकडून सन्मान करण्यात आला आहे. या शूरवीरांची आठवण कायम राहावी यासाठी दहिवली तर्फे वरेडी ग्रुप ग्रामपंचायतीकडून कोनशिला बनवण्यात आली आहे. या माध्यमातून देशासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

- **क्रांतिकारकांच्या कार्याची ऐतिहासिक नोंद**

अमृत महोत्सव मेरी माटी मेरा देश या अभियानांतर्गत कर्जत तालुक्यातील दहिवली ग्रामपंचायतीमध्ये हुतात्म्यांना अभिवादन करण्याचे नियोजन केले होते. म्हणूनच १९४२ च्या लढाईमधील क्रांतिवीरांना सहकार्य करणारे, परंतु दुर्लक्षित असणाऱ्या देशभक्तांचा कोनशिला उभारून गौरव करण्यात आला. या क्रांतिवीरांमध्ये आझाद दस्त्याचा जेव्हा बिरदोले येथे जंगलामध्ये वास्तव्य होता, त्यावेळी भाई कोतवाल आणि गोमाजी पाटील तसेच त्यांना मदत करण्यासाठी

बिरदोले गावातील देशभक्त तरुणांनी त्या सर्वांची राहण्याची व्यवस्था, जेवण, पाणी आदी वस्तू ने-आण करण्यासाठी बैलगाडी, पलायन कापण्यासाठी लागणारे साहित्य या सर्व वस्तू हे पुरवत होते. या गावातील सहा क्रांतिकारक आणि मालेगाव येथील हरिभाऊ भडसावळे अशा सात क्रांतिकारकांची नोंद इतिहासात झाली आहे.

या सर्व क्रातिकारकांची नावे असलेली कोनशिला उभारण्यात आली असून, तिचे अनावरण सरपंच मेघा मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांच्या सूनबाई प्रा. अनुराधा भडसावळे आणि रामचंद्र भवारे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ, सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि क्रांतिकारक यांचे नातेवाईक उपस्थित होते. दहिवली तर्फे वरेडी ग्रुप ग्रामपंचायतीमधील क्रांतिकारकांमध्ये स्व. कान्हु राघो जामघरे, गोमा राघो जामघरे, पदु राघो जामघरे, बुधाजी चांगो कालेकर, बापु चांगो कालेकर, रावजी महादू कालेकर, नागो चिंधु कालेकर आणि हरिभाऊ भडसावळे या क्रांतिकारकांचा सन्मान करण्यात आला आहे.

अनधिकृत बांधकामाची प्रशासनाकडून दखल

आवासमधील बांधकामाची होणार चौकशी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

आवास गावातील समुद्रकिनारी पांडवादेवी मंदिराजवळ सीआरझेडचे उल्लंघन करीत बांधकाम करण्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही बाब गावामधील सुधाकर राणे यांच्यासह काही ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली होती. त्याची दखल प्रशासनाकडून घेण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी प्रत्यक्ष भेट देऊन स्थळपाहणी केली असून, चौकशी अहवाल सादर करण्यात येणार आहे.

आवास येथील पांडवादेवी मंदिराजवळ गेल्या अनेक दिवसांपासून अनधिकृत बांधकाम सुरु आहे. हीजागा सीआरझेडमध्ये समाविष्ट असताना बांधकाम केले जात आहे. डबर सोलिंग करून समुद्राची वाळू बेकायदेशीररित्या काढून बांधकामासाठी वापरली जात आहे. अनधिकृत बांधकामांना प्रशासनाचा वरदहस्त असल्याचे पहावयास मिळत आहे. या बांधकामाबाबत नियोजन प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण, पर्यावरण विभाग यांची कोणतीही परवानगी घेण्यात आली नाही. सीआरझेडचे उल्लंघन करीत होणाऱ्या बांधकामामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तरी, सदरचे बांधकाम त्वरित थांबविण्यात यावे, अशी मागणी सुधाकर राणे, रुपेश राणे, जगन्नाथ घरत, संतोष नागवेकर, मच्छिंद्र कवळे, विश्वनाथ घरत, नैनेश राऊळ, सुरेंद्र कवळे, समीर पाटील यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे केली होती. ११ जुलै रोजी याबाबत निवेदन दिले होते. या निवेदनानंतर उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दखल घेत या अनधिकृत बांधकामाबाबत स्थळपाहणी करून त्या कामाबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश तहसीदारांना दिले आहेत.

मोदी रडणार नाहीत

भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाचे विष आता शाळांमध्ये पोचले आहे. उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगरमधील प्रकार भयंकर आहे. तेथील एका शाळेत एका मुस्लिम मुलाला त्याच्याच वर्गातील इतर मुलांकरवी थोबाडीत मारण्याची शिक्षा देण्यात आली. मुस्लिम मुलाने गृहपाठ केला नव्हता म्हणून ही शिक्षा दिली गेली. बराच काळ हा प्रकार चालू होता. शिवाय, काही वेळेला मुलांनी हळू मारले तर त्याच्यावर या बाई ओरडत होत्या. तृप्ता त्यागी असे या शिक्षिकेचे नाव असून त्याच या शाळेच्या संचालकही आहेत. खुब्बापूर गावात नेहा पब्लिक स्कूल नावाने ही शाळा त्या चालवतात. या घटनेचा व्हिडिओ पसरल्याने समाजाला ही घटना कळली. अन्यथा याआधी असे किती प्रकार या बाईंनी केले असतील व इतरही शाळांमध्ये असे किती प्रकार होत असतील हे सांगणे कठीण आहे. मुलाला मारण्याचा हा प्रकार बराच काळ चालू होता. साहजिकच या अपमानाने व मारहाणीने तो रडतो आहे असेही व्हिडिओमध्ये दिसते. साधी माणुसकी ज्याच्यात शिल्लक असेल अशा कोणाही धर्माच्या व जातीच्या माणसाला हलवून टाकेल अशी ही घटना आहे. या घटनेबाबत ओरड झाल्यानंतर आता त्यागीबाईंनी आपली चूक झाल्याचे मान्य केले आहे. मात्र या घटनेला वेगळे वळण दिले जाऊ नये असेही त्या शहाजोगपणे सांगत आहेत. आपण अपंग असल्याने जाग्यावरून उठू शकत नसल्याने इतर मुलांकरवी या मुलाला थोडे टाईट करण्यासाठी मारहाण केली असे त्यांचे समर्थन आहे. आजकाल मुळात मुलांना मारण्यालाच मनाई आहे. तरीही समजा या त्यागीबाईंना खरेच केवळ शिक्षा करायची असती तर त्याला पाठीत एखादा धपाटा घातला असता. पण एकामागोमाग एक त्याच्याच वर्गातील मुले येऊन त्याच्या कानशिलात मारत आहेत हे दृश्य काय सांगते? उघडच बाईंचा या मुलावर काहीतरी वेगळा राग आहे.

भावी पिढ्या होरपळतील

ही मारहाण होत असताना त्यागीबाई जी बडबड करीत आहेत त्यावरून त्यांचा नेमका राग व दृष्टिकोन लक्षात येतो. या मुस्लिम मुलांना मी सरळ सांगते असे म्हणताना त्या दिसतात. त्यापुढचे वाक्य अस्पष्ट आहे. इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या बातमीनुसार ते वाक्य,- मैंने तो डिक्लेअर कर दिया, जितने भी मोहमेडन बच्चे हे इनके वहा चले जाओ असे आहे. दुसरीच्या वर्गाला शिकवणाऱ्या बाईने मुलांना हिंदू वा मुस्लिम अशा रीतीने शिवी दिल्याप्रमाणे बोलणे हे किती घातक असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री झाल्यापासून या द्वेषाला सतत उकळी आणली जात असते. जीवनाच्या प्रत्येक बाबतीत हिंदू विरुद्ध मुस्लिम असा भेद करणे आणि मुसलमानांना गुंड, देशद्रोही, मागास, समाजविघातक ठरवणे हे योगींच्या राज्यात चालू आहे. त्यागीबाईंची विषारी मुक्ताफळे आणि वागणूक ही त्याचाच परिपाक आहे. याचमुळे या बाईंना चोवीस तास उलटून गेले तरीही अटक झाली नव्हती. त्यांच्याविरुद्ध पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा अगदी सौम्य आहे. दुसरीकडे संबंधित मुस्लिम मुलाच्या वडिलांनी पोलिसांमध्ये दाखल केलेली तक्रार मागे घेण्यात यावी म्हणून आजूबाजूच्या गावातील हिंदू पुढारी त्यांच्यावर दबाव आणत आहेत. हे वडिल व कुटुंब शेतमजूर आहेत. त्यामुळे ते या सर्व दांडगाईपुढे टिकाव धरणे शक्यच नाही. त्यांनी या शाळेतून आपल्या मुलाला काढून घेतले असून आपली तक्रार उरलेली नाही असे काही पत्रकारांना सांगितले आहे. पण वडिलांची तक्रार असो वा नसो, यामध्ये पोलिसांनी कारवाई करण्याची गरज आहे. मुलांच्या मनात धर्मद्वेषाचे विष पेरण्याबद्दल त्यागीबाईंना अटक करून त्यांना अत्यंत कठोर शिक्षा व्हायला हवी. अन्यथा ही आग पसरत जाऊन त्यामध्ये या देशातील भावी पिढ्या होरपळून निघतील. आणि आग पसरेल तेव्हा हिंदू, मुस्लिम किंवा ख्रिश्चन असा भेद करणार नाही.

भारत टिकेल काय?

एकीकडे चांद्रमोहिम यशस्वी झाली म्हणून सध्या भारताचा जगात गौरव होतो आहे. पण त्याच भारतात अगदी लहान मुलांच्या पातळीवर द्वेषाचे हे असे वातावरण निर्माण केले जात आहे. या सर्वांना सत्तारुढ भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्ववादामुळे फूस मिळते आहे हे भयंकर आहे. शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बंगळुरूमध्ये इस्रोच्या शास्त्रज्ञांना भेटले व त्यावेळी ते बरेच भावूक झाले अशी वर्णने प्रसिध्द झाली आहेत. पण मुजफ्फरनगरमधील त्या मुलाच्या बाबत जे घडले ते काहीही बोललेले नाहीत व बोलणारही नाहीत. देशाच्या नावाने खरेखोटे उमाळे काढणारे मोदी या देशातील जिवंत माणसांना जो त्रास होतो त्याबद्दल टिपूसदेखील गाळताना दिसलेले नाहीत. गुजरात दंगलीबाबत त्यांनी कधीही निखळ दुःख व्यक्त केलेले नाही. तीच गोष्ट अलिकडच्या मणिपूरची. आतादेखील मोदी या घटनेबाबत रडणार नाहीत वा खेद व्यक्त करणार नाहीत. मोदी सोडा, त्यांच्या पक्षाचे बोलभांड प्रवक्तेही या घटनेबाबत चिडीचूप आहेत. हीच गोष्ट काँग्रेसशासित राज्यात घडली असती किंवा समजा एखाद्या मुस्लिम शिक्षिकेने हिंदू मुलाच्या संदर्भात असा काही प्रकार केला असता तर एव्हाना हा राष्ट्रीय प्रश्न बनला असता व संबंधित शिक्षिका केव्हाच गंभीर गुन्ह्याखाली तुरुंगात असती. आपल्या जीवनाचे हरेक क्षेत्र अशा रीतीने धर्माच्या आधारे वाटले जाणे व त्याआधारे त्याची चर्चा होणे वा न होणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. आईवडिलांनंतर लहान मुलांच्या आयुष्यात सर्वाधिक काळ असतात व जे त्यांच्यावर प्रभाव टाकतात ते म्हणजे शिक्षक. ते लक्षात घेतले तर, एका शिक्षिकेने धर्मद्वेषाची भाषा बोलणे आणि तिला राजसत्ता आणि बहुसंख्य समाजाचे मूक समर्थन असल्यासारखे वातावरण निर्माण होणे हे देशाला विनाशाच्या दिशेने नेणारे आहे. उद्या भारत चंद्रावर माणूस पाठवेल, तिसरी मोठी अर्थव्यवस्था होईल. पण ज्या देशात मुलांना असे रडवले जाणार असेल तर तो भारत, भारत म्हणून टिकेल काय?

विचार

ग्राहकसेवेचा वसा, गृह-वाहन उद्योगाचा ठसा

अनाहूत कारणांमुळे देशभरातील बँकांमध्ये पडून असलेल्या रकमेची माहिती देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सुरु केलेले 'उद्गम' नावाचे पोर्टल एक महत्वाची ग्राहकसेवा ठरत आहे. याच सुमारास बांधकाम साहित्यामध्ये काहीशी घट झाल्यामुळे घरबांधणीचा खर्च कमी होत असल्याची माहिती पुढे आली आहे. वाहन उद्योगानेही टॉप गिअर टाकल्याचे अलिकडच्या काळातले विक्रीचे आकडे पाहता स्पष्ट होत आहे.

महेश देशपांडे

कोणीही दावा न केल्याने देशभरातील विविध बँकांमध्ये पडून असलेल्या रकमेची माहिती देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सुरु केलेले 'उद्गम' नावाचे केंद्रीकृत वेब पोर्टल ग्राहकसेवेचा वसा घेणाऱ्या योजनेपैकी एक ठरत आहे. याच सुमारास बांधकाम साहित्यामध्ये काहीशी घट झाल्यामुळे घरबांधणीचा खर्च कमी होत असल्याची माहिती पुढे आली आहे. बांधकाम उद्योगाप्रमाणेच वाहन उद्योगानेही टॉप गिअर टाकल्याचे अलिकडच्या काळातले विक्रीचे आकडे पाहता स्पष्ट होत आहे. दरम्यान, विसा आणि मास्टरकार्डला पुरुन उरलेल्या युपीआयच्या घोडदौडीमुळे दस्तुरखुद्द अमेरिका चिंतेत असल्याची वदंता आहे.

बँकांमधील दावा न केल्याने पडून असलेल्या रकमेची माहिती देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेत 'उद्गम' नावाचे एक केंद्रीकृत वेब पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलद्वारे कोणतीही व्यक्ती दावा न केल्यामुळे बँकांमध्ये पडून असलेल्या ठेवी तपासून पाहू शकते. हे पोर्टल रिझर्व्ह बँकेने स्वतः विकसित केले आहे. याच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांना स्वत:च्या किंवा त्यांच्या जवळच्या आणि नातेवाइकांच्या नावाने बँकांमध्ये असलेल्या; परंतु बेवारस, हक्क नसलेल्या ठेवी शोधण्यास मदत होणार आहे. ही रक्कम एकापेक्षा जास्त बँकांमध्ये असली तरी ठेवीदारांना पोर्टलची मदत घेऊन ठेवींची माहिती घेता येणार आहे. दावा न केलेल्या ठेवींचा मागोवा घेण्यासाठी केंद्रीकृत वेब पोर्टल विकसित करण्याची घोषणा रिझर्व्ह बँकेने केली होती. दावा न केलेल्या ठेवींचा वाढता ट्रेंड पाहता रिझर्व्ह बँकेने जनजागृती मोहीम सुरू केली आहे. सामान्य लोकांनी दावा न केलेल्या ठेवी तपासून पाहण्यासाठी रिझर्व्ह बँकेने काही बँकांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला आहे. या वेब पोर्टलच्या मदतीने ठेवीदार दावा न केलेले ठेव खाते शोधून त्यावर दावा करू शकतील किंवा त्यांच्या संबंधित बँकांना भेट देऊन ठेव खाते पुन्हा सक्रिय करू शकतील.

रिझर्व्ह बँकेने सांगितले की सध्या सात बँकांमधील हक्क सांगितला न गेलेल्या ठेवींचे तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहेत. युजर पोर्टलला भेट देऊन हे तपशील तपासले जाऊ शकतात. इतर बँकांमध्ये जमा केलेल्या, दावा न केलेल्या ठेवींचे तपशील १५ ऑक्टोबरपर्यंत टप्प्याटप्प्याने पोर्टलवर अपलोड केले जातील. सुरुवातीला प्रायोगिक तत्वावर सात बँकांचे ठेवीदार याबाबत माहिती घेऊ शकतात. यामध्ये सेंट्रल बँक, डीबीएस बँक, धनलक्ष्मी बँक, पंजाब नॅशनल बँक, साऊथ इंडियन बँक, स्टेट बँक आदींचा समावेश आहे. फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या आढावात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये जवळपास ३५ हजार कोटी रुपयांच्या हक्क न सांगण्यात आलेल्या ठेवी पडून असल्याची महिती रिझर्व्ह बँकेने दिली होती. यात दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ चालू नसलेल्या खात्यांचा समावेश आहे. एकट्या एसबीआयमध्ये ८ हजार ८६ कोटी रुपयांच्या दावा न केलेल्या ठेवी पडून आहेत.

दरम्यान, स्टील आणि अन्य वस्तूंच्या किंमती घटल्याने घरबांधणीचा खर्च कमी होत असल्याची माहिती समोर आली आहे. 'नाइट फ्रँक इंडिया'च्या मते देशातील टॉप-८ शहरांपैकी अहमदाबादमध्ये सर्वात स्वस्त निवासी मालमत्ता उपलब्ध आहेत. येथे घर खरेदी करण्यासाठी लोकांना मासिक उत्पन्नातील २३ टक्के खर्च करावा लागतो तर कोलकाता आणि पुण्याचे नाव या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. या दोन्ही शहरांमध्ये लोकांना त्यांच्या उत्पन्नाच्या २६ टक्के रक्कम 'ईएमआय'मध्ये खर्च करावी लागते. देशात कोरोनानंतर रिझर्व्ह बँकेने रेपो दरात सतत वाढ केली आहे. अशा परिस्थितीत ग्राहकांवरील 'ईएमआय'चा बोजा वाढला आहे. मात्र तरीही लोकांना मोठ्या शहरांमध्ये घरे घेणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. प्रत्येकाला आपल्या स्वप्नातील घर बांधायचे असते; परंतु ते साध्य करणे सोपे नसते. लोक यासाठी मोठी तयारी करतात आणि पै पै जोडून पैसे गोळा करतात; मात्र त्यानंतरही योजना पुढे ढकलावी लागते. घर बांधताना सर्वात मोठा भार बांधकाम साहित्याचा पडतो. विशेषत: सळया, सिमेंट आणि वीट एकूण खर्चात सर्वाधिक महाग पडतात. सध्या देशात पावसाळा सुरू आहे. या काळात बांधकाम साहित्याची मागणीही कमी झाल्यामुळेच बांधकाचम्म साहित्याचे भाव तुटले आहेत. लोखंडी सळयांबरोबरच विटा आणि सिमेंटचे दरही कमी झाले आहेत. स्वप्नातील घर बांधण्यासाठी हा सर्वोत्तम काळ असल्याचे सिद्ध होत आहे. वीट-सिमेंट स्वस्त दरात मिळून घर बांधण्यासाठी सर्वात चांगला काळ आहे.

याच सुमारास 'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) ने जुलै २०२३ मध्ये विकल्या गेलेल्या वाहनांचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यानुसार, गेल्या महिन्यात भारतीय ऑटो मार्केटमध्ये वार्षिक दहा टक्के वाढीसह १७ लाख ७० हजार १८१ वाहनांची विक्री झाली आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये १६ लाख ०९ हजार २१७ वाहनांची विक्री झाली होती. परिणामी, मारुती सुझुकीचा बाजार हिस्सा वार्षिक आधारावर ३९.०७ टक्क्यांवरून ४१.३९ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये कंपनीने एक लाख सहा हजार कार विकल्या. दुचाकींच्या विश्वात हिरो मोटोकॉर्प तीन लाख ६१ हजार वाहनांच्या विक्रीसह जुलै महिन्यामध्ये अव्वल स्थानी आहे. बजाज ऑटोने तीनचाकी वाहनांच्या विभागात सर्वाधिक ३१ हजार ४५३ वाहनांची विक्री केली असून व्यावसायिक विभागात २६ हजार ६३५ वाहनांच्या विक्रीसह टाटा मोटर्स पहिल्या क्रमांकावर आहे. 'फाडा'चे अध्यक्ष मनीष राज सिंघानिया म्हणाले, भारताच्या किरकोळ वाहनांच्या विक्रीमध्ये जून महिन्याच्या तुलनेत जुलैमध्ये पाच टक्क्यांची घट झाली आहे. विशेषतः उत्तर भारतात तीव्र पावसाळा आणि पूरसदृश परिस्थितीमुळे विक्रीवर परिणाम होत आहे. दुचाकी आणि प्रवासी वाहनांच्या विक्रीत या महिन्यात वाढ अपेक्षित आहे. सणासुदीच्या हंगामामुळे दुचाकी आणि प्रवासी वाहनांच्या विक्रीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. तीनचाकी वाहनांच्या श्रेणीमध्ये इलेक्ट्रिक व्हेरियंटकडे रस दिसून येत आहे.

अलिकडच्या काळात भारताच्या 'पेमेंट इकोसिस्टीम'ने जगाचे लक्ष वेधले आहे. 'युनिफाईट पेमेंट्स इंटरफेस' अर्थात 'युपीआय'चा डंका जगभर वाजत आहे. सिंगापूर, जर्मनी, फ्रान्सच नाही तर अनेक देश या पेमेंट सिस्टिमविषयी उत्सुक आहेत. भारताचे 'युपीआय' आता देशापुरते मर्यादीत राहिले नाही, तर ते आता 'ग्लोबल' झाले आहे. त्याला जागतिक झळाळी मिळाली आहे. इतर देशांनाही भारताची ही सक्षम व्यवहार प्रणाली हवी आहे. त्यासाठी भारताकडे मागणी होत आहे; पण यामुळे अमेरिका चिंतेत पडली आहे. देशात सुरुवातीला युपीआयची टिंगल झाली होती. हॅकर्सची भीती दाखवून ही सिस्टीम चालणार नाही, अशी शेरेबाजी झाली होती; पण आता याच यंत्रणेने अमेरिकेपुढे आव्हान उभे केले आहे. भारतात यापूर्वी 'डिजिटल पेमेंट'च्या नावाखाली डेबिट आणि क्रेडीट कार्डचा बोलबाला होता. या क्षेत्रात अर्थातच मास्टरकार्ड आणि व्हिसा या अमेरिकन कंपन्यांचा दबदबा होता. कोणत्याही भारतीय बँकेकडून क्रेडिट अथवा डेबिट कार्ड घेतले, तरी त्याचे ऑपरेटिंग या दोन कंपन्याच करत होत्या. या कंपन्या मनमानी शुल्क आकारत होत्या. तसेच भारतायींच्या आर्थिक आणि 'डिजिटल पेमेंट डेटा'वर लक्ष ठेवून 'पेमेंट डेटा' अमेरिकेतील सर्व्हरवर जतन करुन ठेवत होत्या.

ही मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी रुपे डेबिट आणि क्रेडीट कार्ड आणण्यात आले. या एकाधिकारशाहीला आव्हान दिले तरी या कंपन्यांची दादागिरी कमी झाली नव्हती. त्यासाठी केंद्र सरकारने 'युपीआय पेमेंट सिस्टीम' विकसीत केली. त्यासाठी राष्ट्रीय देयके महामंडळाने पुढाकार घेतला. आता 'युपीआय' हे पेमेंट, व्यवहारासाठी सर्वात लोकप्रिय, सहज उपलब्ध व्यासपीठ झाले आहे. 'युपीआय' आता परदेशातही लोकप्रिय झाले आहे. त्यामुळे मास्टरकार्ड आणि व्हिसाच्या एकाधिकारशाहीला धक्का बसला आहे. गेल्या वर्षापासून 'युपीआय पेमेंट'वर 'फोन पे' आणि 'गुगल पे'चा वरचष्मा वाढला आहे. या दोन ॲपसह इतरही ॲप्स मैदानात आहेत. त्यांचा बाजारातला वाटा अधिक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने त्यांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी 'युपीआय प्लगइन सिस्टीम' विकसीत केली आहे. 'युपीआय प्लग इन सिस्टीम'मुळे ऑनलाईन पेमेंटसाठी थर्ड पार्टी ॲप्सची गरज उरणार नाही. या नवीन फीचरमुळे ऑनलाईन पेमेंटसाठी 'व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस'चा वापर करता येईल. त्यामुळे पेमेंट सहज होईल.

आजकाल

पाण्याचा शोध- पृथ्वीवरचा नि चंद्रावरचा

संजीव चांदोरकर

एवढे टोकाचे अंतर्विरोध आपला देश भविष्यात सहन करू शकेल का ?

विचारी, संवेदनशील प्रौढ नागरिकांना आवाहन! पक्ष/नेत्यांप्रती असणाऱ्या तुमच्या निष्ठांच्या पलीकडे जाऊन विचार करा !

चन्द्रावरच्या पाण्याचा शोध लावण्याचा आपल्या देशाचा कार्यक्रम यशस्वी होतोय, अभिमान आहेच.

पण एका घागरीभर पिण्याच्या पाण्याच्या शोधासाठी पिढ्यानपिढ्या पायपीट करणाऱ्या आपल्या बाया मुलींसाठी आपला कार्यक्रम काय ; आणि दुसऱ्या जातीचा /धर्माचा आहे म्हणून पाणी नाकारण्याची एकविसाव्या शतकात देखील टिकून राहिलेली चिवट/घृणास्पद प्रथा , काही आहे कालबद्ध कार्यक्रम?

उद्या काही कोटी रुपये तिकीट आकारून स्पेस शटल मधून अवकाशात फेरफटका मारण्याचे पर्यटन क्षेत्र विकसित होणार हे नक्की; आणि योजनेसारखी त्याला भरघोस सबसिडी देखील दिली जाईल.

पण छानचौकीसाठीचे पर्यटन जाऊद्या, पत्रे निघालेली, हाडे खिळखिळी करणारी , चंद्रापेक्षा जास्त खड्डे पडलेल्या रस्त्यावरून फरफटत जाणारी सार्वजनिक बस सेवा ..... तिला किमान मानवी करण्याचा कार्यक्रम आहे का आपल्याकडे ?

विज्ञान/तंत्रज्ञान क्षेत्रात देश नवनवीन क्षेत्र पादाक्रांत करत आहे; अभिमान आहेच.

पण लाखो नागरिकांना/तरुणांना मध्ययुगीन कर्मकांडात अधिकाधिक भ्रमित करणाऱ्यांची संख्या देखील वाढवली जात आहे , याची नोंद आपण घेणार आहोत कि नाही

इसरो सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात/ आणि त्यांना विविध प्रकारचे कंपोनंट्स, सेवा पुरवणाऱ्या खाजगी क्षेत्रात भाषा/प्रांत/जात/धर्म लिंग यापलीकडे जाऊन वर्षानुवर्षे एकच ध्येय/एकच स्वप्न घेऊन चिकाटीने एकत्र/टीममध्ये काम करणारे आपले नागरिक प्रोफेशनल्स; उर भरून येतो.

आणि त्याचवेळी भाषा/प्रांत/जात/धर्म/लिंग भेद अजून अजून घट्ट करत एकमेकांचा दुस्वास करायला, एकमेकांना भोसकायला शिकवणारी प्रयत्नपूर्वक रुजवली जाणारी विचारधारा.

हि फक्त एक छोटी यादी आहे, विरोधाभासांची; टोकाची आर्थिक विषमता, टोकाचा वेग पकडलेला पर्यावरणीय ऱ्हास, पंचतारांकित इस्पितळे आणि साध्या क्रोसिनला मोताद माणसे... कितीतरी गोष्टी सांगता येतील.

तुम्हीच बघा आजूबाजूला, बातम्या वाचा/ ऐका, तुम्हाला देखील माहित आहेत आपल्या देशातील टोकाच्या स्ट्रक्चरल कॉन्ट्राडिक्शन्स; या ताणतणावात प्रचंड शक्ती असते, सिस्टीम आज सहन करत आहे, म्हणजे तहहयात करेलच याची गॅरंटी कोण देणार.आणि याकडे मानवतावादी अपील म्हणून नका बघू; याच्या किमती मोजतो देश, अगदी रुपया/पैशात; इतिहास साक्ष आहे ; आपण आपल्या बुद्धीशी प्रामाणिक राहूया.

हे विरोधाभास आपोआप जाणाऱ्या नाहीत मित्रांनो; फक्त तुमच्या आयुष्यापुरता विचार नका करू; तुमच्या मुलांना/नातवंडाना/पतवंडाना इथेच नांदायचे आहे.

कोणीही भुकेला राहू नये याची शिकवण देणारे संत आणि एक तीळ सर्वांनी वाटून खावा अशी कामना करणारे कवी आपल्यासाठी महत्वाचे आहेतच.पण त्याचवेळी हाय यिल्डींग व्हरायटी बियाणे, कमी पाणी खाणारी पिके आणि तत्सम शोध लावणारे शेती संशोधक देखील महत्वाचे आहेत ; जरी ते आपला आदर्शवाद/राजकीय विचारधारा मानत नसले तरी शारीरिक व्याधींवर अंगारे/धुपारे/व्रत वैकल्ये/बाबा, पीर, गुरु/अंधश्रद्धा कामाच्या नाहीत हे समाजात जाऊन सांगणे महत्वाचे आहेच.

पण त्याचवेळी शारीरिक व्याधींवर कमी उत्पादन खर्च असणारी औषधे शोधून काढणारे औषध निर्माण क्षेत्रातील संशोधक/उत्पादनासाठी यंत्र सामुग्री बनवणारे तंत्रज्ञ, कौशल्ये विकसित करणारे/आत्मसात करणारे शल्य विशारद हे देखील आपल्यासाठी महत्वाचे आहेत जरी ते आपला आदर्शवाद/ राजकीय विचारधारा मानत नसले तरी ऊर्जेच्या अतिवापरावर आधारित आर्थिक मॉडेल/ ऊर्जेच्या अतिवापरामुळे नैसर्गिक साधनसामुग्रीचे होणारे कायमचे नुकसान/कार्बन एमिशनस आणि वातावरण बदल यावर संशोधन करून जनजागृती करणारे महत्वाचे आहेतच.

पण सौर ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जास्रोतांवर काम करून त्याची तांत्रिक फिजिबिलिटी/आणि उत्पादन खर्च कमी करण्यासाठी झटणारे शास्त्रज्ञ/ तंत्रज्ञ देखील आपल्यासाठी महत्वाचे आहेत जरी ते आपला आदर्शवाद/राजकीय विचारधारा मानत नसले तरी नियोजनावर आधारित अर्थव्यवस्था आणि बाजाराधिष्टित अर्थव्यवस्था यामधील फरक, बारकावे, मार्केट शक्तींना मोकाट सोडल्यामुळे होणारे कोट्यवधी नागरिकांचे नुकसान यावर मांडणी करणारे महत्वाचे आहेतच.पण आधुनिक/ औद्योगिक/भांडवली/जागतिक अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्लॅनिंगसाठी अत्यावश्यक असणारा म हाकाय डेटा अत्यल्प खर्चात/ऑनलाईन कसा गोळा करायचा, डेटा प्रोसेसिंग कसे करायचे यावर संशोधन करणारे गणिती/तंत्रज्ञ देखील आपल्यासाठी महत्वाचे आहेत जरी ते आपला आदर्शवाद/ राजकीय विचारधारा मानत नसले तरी हि झाली फक्त काही उदाहरणे; त्यात अजूनही भर घालता येईल.

मानवकेंद्री/पर्यावरण स्नेही समाजव्यवस्था/ अर्थव्यवस्था (त्याला समाजवाद म्हणा किंवा म्हणू नका)अस्तित्वात येण्यासाठी हातभार लावू शकणाऱ्या सर्वच गोष्टी त्या आदर्शवादावर/राजकीय विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींकडूनच येतील असे नाही.

व्हायरल

'आमोद सुनासि आले'- दास्तान गोई

'आता आमोद सुनासि आले। श्रुतीशी श्रवण निघाले' ही अमृतानुभवातल्या 'ज्ञान-अज्ञान भेद कथन' या प्रकरणातील संत ज्ञानेश्वरांची ओवी ज्ञाता आणि ज्ञेय (जाणणारा आणि जे जाणायचे ती गोष्ट) यांच्यातील अद्वैत दर्शविते. आमोद म्हणजे सुगंध, सुनास म्हणजे नाक - हे एक उदाहरण. या कथेतही वेगवेगळ्या पातळीवर, वेगवेगळ्या गोष्टींतले द्वैत - अद्वैत दि. बा. मोकाशी दाखवतात.

आमोद सुनासि आले ही दि. बा. मोकाशींची कथा खूप पूर्वी म्हणजे काही वर्षांपूर्वी वाचली होती. सुमित्रा भावे यांनी या कथेवर आधारित दिठी नावाचा चित्रपट केला. या कथेवर आधारित दास्तान ए राम जी ही अक्षय शिंपी आणि नेहा कुलकर्णी यांनी सादर केलेली दास्तानगोई काल पाह्यली. कथा, चित्रपट आणि दास्तानगोई या तिन्ही प्रयोगात दास्तानगोई उजवी आहे. कारण दि. बा. मोकाशी यांच्या कथेला प्रामाणिक राहून अक्षय आणि नेहा यांनी या कथेचा वेगळा अर्थ आपल्या कथन-नाट्यातून उकलला आहे.

दास्तानगोईनंतरच्या प्रश्नोत्तरांचा समारोप करताना कुमार केतकर म्हणाले, अस्तित्ववादाच्या दोन शाखा आहेत. एक शाखा सिनिसिझमकडे (तुच्छतावाद) तर दुसरी निहिलीझमकडे (विनाशवाद) जाते. रामजीपुढचा अस्तित्वाचा प्रश्न अतिशय प्रभावीपणे आपण सादर केलात आणि निर्मिती आणि सृजनाच्या आनंदाचा मुद्दा अचूकपणे बाहेर काढलात त्यामुळे तुच्छतावाद आणि विनाशवादाच्या पेचातून आम्हाला सोडवलत. हा प्रयोग पाह्यल्यावर माझी बोलतीच बंद झाली होती. नितिन वैद्य यांनी आग्रह केला म्हणून मी बोलतोय एवढंच.

दास्तानगोईला मिळालेल्या प्रतिसादाने राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष नितीन वैद्य आनंदीत झाले होते. आजच्या सांस्कृतिक गळचेपीच्या काळात अशा प्रकारचे कार्यक्रम आपली उमेद जागवतात. राष्ट्रसेवा दला म्हणूनच असे कार्यक्रम आयोजित करत आहे.

दास्तानगोई या इराणमधून आलेल्या प्रकाराचा सखोल अभ्यास अक्षय आणि नेहा यांनी केला आहे. नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत कशाचीही गरज नाही. मंच वा स्टेजचीही गरज नाही. कथननाट्य करणारे कलावंत केवळ एका जागी बसूनच अभिनय करतात. पुरुष स्त्रीपात्र रंगवतो वा स्त्री पुरुषपात्र.

अक्षय आणि नेहा यांचं मनापासून कौतुक.

हा कार्यक्रम सादर करायला हे दोघेही आसुसलेले आहेत. त्यांना आपल्या घरी, संस्थेत, थिएटरात, बागेत, कार्यक्रमाला अवश्य निमंत्रित करा.

दास्तानगोई हा प्रकार महाराष्ट्रात रुजावा, फुलावा आणि समृद्ध व्हावा.

- सुनील तांबे

लोकसंसद

पावसा, कधी रे येशील परतून?

जुलै महिन्यात दमदार हजेरी लावल्यानंतर संपूर्ण ऑगस्ट महिन्यात पावसाने बऱ्यापैकी विश्रांती घेतली. पण पावसाच्या या विश्रांतीमुळे खरिपाची पिके धोक्यात आली असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. भारतीय हवामान खात्याने १८ ते २४ ऑगस्ट दरम्यान राज्यात पुन्हा एकदा पाऊस जोर धरेल असे भाकीत केले होते. पण ऑगस्ट महिना संपत आला तरी पावसाने अद्याप दडीच मारलेली आहे. हवामान खात्याच्या आणखी एका अंदाजानुसार सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात म्हणजे ८ ते २१ सप्टेंबरपर्यंत राज्यात सरासरी इतका किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोळा आणि गणपती उत्सवात चांगला पाऊस होईल या आशेवर शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागले आहेत. दुसरीकडे सध्या राज्यातील धरणांतला जलसाठा गेल्यावर्षीच्या ८३.३४ टक्क्यांच्या तुलनेत २० टक्क्यांनी कमी होऊन ६३.४८ टक्के इतका झाला आहे. भरीस भर म्हणून उन्हामुळे जलसाठ्यांचे वेगाने बाष्पीभवन होत असून राज्यातील जलसाठ्यांची पातळी खालावत चालली आहे. अशा परिस्थितीत पावसा, कधी रे येशील परतून? अशी चिंता सर्वांच्या मनात भेडसावत आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

मूळ स्वभाव जाईना, त्याचा येळकोट राहिना !

आधी होता वाघ्या ।
दैवयोगे झाला पाग्या ।
त्याचा येळकोट राहिना ।
मुळ स्वभाव जाईना।।

एखादा मनुष्य नीच पदावरून कितीहि श्रेष्ठ पदावर गेला तरी त्याची स्वाभाविक प्रवृत्ति त्यास सोडून जात नाही. मधून मधून तिची उचल होऊन त्याचे खरे स्वरूप बाहेर पडतेच.

एक माणूस प्रथम खंडोबाचा वाघ्या होता तेव्हां त्याला मल्हारी मार्तंडाचा येळकोट म्हणून जयजयकार करण्याची संवय होती, कारण खंडोबाचे भक्त तळी भरण्याच्या वेळी असे शब्द उच्चारतात. नंतर त्या म नुष्याला पागेवरचा मुख्याधिकारी म्हणजे घोडदळाचा मुख्य केले तेव्हा रणगर्जनेच्या वेळीही तो येळकोट येळकोट म्हणूनच ओरडूं लागला कारण एकच मूळ वृत्ति जात नाही. तसेच कुत्र्याचे शेपूट आणि गेंड्याची कातडी या दोन शब्दप्रयोगाचे आहे. गेंड्याच्या कातडीला हात लावण्याचा नि कुत्र्याचं शेपूट नळीत घालून सरळ करण्याचा उपद्व्याप न करता पूर्वसुरींनी सांगितलेला त्यांचा अनुभव गृहीत धरून आपणास ते समजते .

पण हे गुणधर्म जेव्हा स्वभावधर्म म्हणून माणसात आढळतात, तेव्हा अशा माणसांचं काय करायचं याचा आपल्याला प्रश्न पडतो आणि मग मुकाटपणे अशी माणसं आहेत तशी समाजाला झेलणं भाग पडतं.

या दोन्ही प्रकारात एवढेच म्हणता येते की, मूळ स्वभाव जाईना आणि त्याचा येळकोट राहिना..

निवडक

पाककला स्पर्धेचे आयोजन

रसायनी : वासांबे जिल्हा परिषद विभागातील उध्दव ठाकरे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या वतीने मोहोपाडा येथील जनता विद्यालय शाळेच्या सभामंडपात शनिवार, दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शिवसेना महिला आघाडी उपतालुकाप्रमुख प्रीती कडव ९७६७६५३६३६, वासांबे महिला विभागप्रमुख सद्गुणा पाटील ९७६७२१८४८६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

'टपाल कार्यालय सुरू करा'

नवी मुंबई : ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार राजन विचारे यांच्या पाठपुराव्याने ऐरोली, सेक्टर १८ येथील भूखंड मिळाल्यानंतर त्या ठिकाणी आधुनिक सुविधांसह तीन मजली टपाल कार्यालय उभारण्यात आले आहे. या टपाल कार्यालयाचे लोकार्पण करावे, अशी मागणी विचारे यांनी केली आहे. मागील महिन्यात राजन विचारे यांनी टपाल कार्यालयाला भेट देऊन इमारतीची पाहणी करून सोयी-सुविधांचा आढावा घेतला होता.

आज पालखी सोहळा

अलिबाग : तालुक्यातील चौलमळा गावातील विठ्ठल-रखुमाईच्या मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता उद्या सोमवार, दि. २८ ऑगस्ट रोजी पालखी मिरवणुकीनंतर होणार आहे. श्रावणातील पहिल्या सोमवारपासून या सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. मागील सात दिवस रात्रंदिवस हा सप्ताह सुरू होता. दरम्यान, पालखी सोहळ्यास मोठ्या संख्येने ग्रामस्थ, भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन गावप्रमुख रवींद्र घरत यांनी केले आहे.

आदिवासींना मोबाईल फोन

पनवेल : सामाजिक विकास मंडळ पनवेल व रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १५वे मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार महाशिबीर आठ ऑक्टोबरला होणार आहे. मंडळाचे उपाध्यक्ष अरुण भगत यांनी ही माहिती दिली. खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात हे शिबीर होणार आहे. या शिबिरात सर्वसाधारण रोग तपासणी, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, त्वचारोग, हृदयरोग आदींची मोफत तपासणी करण्यात येणार आहे.

माणगावमध्ये घरफोडी

माणगाव : घरातील लाकडी कपाटातून ड्रावरमध्ये ठेवलेली ३० ग्राम वजनाची सुमारे १ लाख ८० हजार रुपये किमतीची सोन्याची बांगडी घेऊन अज्ञात चोरटा फरार झाला आहे. ही घटना दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी १२ वाजण्याच्या सुमारास ते दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबतची फिर्याद गीता महेंद्र मेथा (५२) रा. विनायक ऑटो सेंटर बाजारपेठ, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ ऑगस्ट

१) श्रीम. गुलाब दत्ताराम कोळी
नवगाव, अलिबाग, २८-८-१९४९

पंचांग

२८ ऑगस्ट २०२३
सोमवार
विक्रम संवत्- २०७९
श्रावण शके संवत्- १९४५
संवत्सर – शोभननाम
अयन- दक्षिणायन
मास- श्रावण
ऋतु- वर्षा
शुक्ल पक्ष
तिथि : द्वादशी १८:२३:००
नक्षत्र : उत्तराषाढा २६:४३:०९+
योग : आयुष्मान ०९:५६:००
योग : सौभाग्य ३०:०१:२५+
करण : बव ०८:०१:३७
करण : बालव १८:२३:००
करण : कौलव २८:३८:०७+
सूर्य: सिंह
चन्द्र : मकर१०:३९:४४
हिजरी सन् - १४४५
मुस्लिम मास - सफर
तारीख - ११
विशेष
सोमप्रदोष
श्रावणी सोमवार शिवपूजन
शिवामूठ : तीळ

सुडोकू

8	2					1		
	5			9	3		2	
7		3		1	2		9	8
		5	1	3				
3				7				1
				2	6	9		
5	3		2	4		8		9
	1		3	6			4	
		2					6	5

PRESS SERVICES OF INDIA

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

2	4	8	1	5	7	9	3	6
1	5	7	6	9	3	4	2	8
3	6	9	8	4	2	1	5	7
7	3	5	2	8	9	6	4	1
4	8	1	7	6	5	2	9	3
9	2	6	3	1	4	8	7	5
5	1	4	9	7	8	3	6	2
8	9	2	5	3	6	7	1	4
6	7	3	4	2	1	5	8	9

PRESS SERVICES OF INDIA

बारा वर्षांपासून भूखंडांच्या प्रतिक्षेत

प्रकल्पग्रस्तांचा वनवास संपणार कधी? राखीव भूखंडांवर खारफुटीचे साम्राज्य

। उरण । वार्ताहर ।

उरण द्रोणागिरी परिसरातील हजारो प्रकल्पग्रस्त १२ वर्षांपासून सिडकोच्या साडेबारा टक्के भूखंड वाटप योजनेपासून वंचित आहेत. त्यामुळे आणखी किती वर्षे भूखंडाची प्रतीक्षा करावी लागणार आहे, असा सवाल प्रकल्पग्रस्सतांनी उपस्थित केला आहे. द्रोणागिरी-उरण परिसरातील हजारो प्रकल्पग्रस्त गत ३२ वर्षांपासून साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळावेत म्हणून सिडकोचे उंबरठे झिजवत आहेत. परंतु, त्यांच्या पदरी निराशाच पडत आहे.

साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या उरण द्रोणागिरी परिसरातील ५७५ प्रकल्पग्रस्तांना एकूण ३२.४२ हेक्टर जागेचे वाटप येत्या सहा महिन्यांत केले जाणार असल्याची घोषणा नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली होती. सद्यःस्थितीत प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यासाठी सिडकोच्या हातात जागा उपलब्ध नाही. प्रकल्पग्रस्तांना भूखंड उपलब्ध करुन देण्यासाठी पर्याय म्हणून बोकडवीरा, चाणजे, पागोटे, नागाव, रानवड, नवघर या सात गावांतील जमीन सिडकोद्वारे संपादित केली जाणारी ३६४ हेक्टर जमीन, या दोन्ही पर्यायांचा अवलंब केला जाणार असल्याचे मंत्र्यांनी अधिवेशनात सांगितले होते.

द्रोणागिरी परिसरात विकसित केलेल्या शहरी भागातील एखाद्या सेक्टरमधील किमान ४० हेक्टर जागा साडेबारा टक्के भूखंड वाटप योजनेसाठी राखीव ठेवल्यास सिडको व शासनाचा वेळ, पैसा या दोन्हीमध्ये बचत होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मुरूडमध्ये स्वच्छता मोहीम

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुडमध्ये जिल्हाधिकारी-रायगड यांच्या निर्देशनानुसार नगरपरिषदेमार्फत मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुलभीकरण व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

स्वच्छतेमुळे आपले मानवी जीवन सुरक्षित राहते ही जनजागृतीही होते या उक्तीनुसार शहरातील मारुती नाका, गणेश आळी ते मुरूड एकदरा ब्रिज अशी रस्ते स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगरपालिका प्रशासन अधिकारी परेश कुंभार, इंजिनिअर चिदानंद व्हटकर, नगरपरिषद कर्मचारी अभिजीत चांदोरकर, नरेंद्र नांदगावकर, शुभ्रा कारभारी, वेटकोळी, निमकर, तटरक्षक जवान नगरपरिषद शाळांचे शाळाप्रमुख दिनेश भोईर, राजश्री गजने, मंगल मुनेकर, सहशिक्षक महेंद्र हावरे, अविनाश ठाकूर, अभिजीत ठाकूर, उत्कर्षा रणदिवे, प्रेरणा चौलकर, माजी नगरसेवक अविनाश दांडेकर, रूपेश भाटकर, अमित रणदिवे, सी.के.पी समाज अध्यक्षा नैनिता कर्णिक, नगरपरिषद सफाई कामगार, नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.

डॉ. शंकर अंदानींच्या सेवाभावी कामाची दखल

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सनदी लेखपाल सीए, डॉ. शंकर घनश्यामदास अंदानी यांनी केलेल्या विक्रमी कामाची नोंद लंडन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. त्यांनी २०२२-२३ या आर्थिक वर्षात मंदिर, मस्जिद, चर्च आदी ३६४ धार्मिक स्थळांचे सेवाभावाने केलेल्या कार्याची दखल या रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे. नुकतेच लंडन बुक ऑफ रेकॉर्डच्या अधिकृत संकेतस्थळावर त्यांच्या कामांची नोंद जाहीर करण्यात आली आहे.

अहमदनगर येथील डॉ. शंकर अंदानी सीए असून, मागील अनेक वर्षांपासून समाजकार्य करीत आहे. त्यांनी मंदिर, मस्जिद, चर्च आदी धार्मिक स्थळांच्या ट्रस्टचे काम सेवाभवाने केले. त्यांनी केलेल्या या कामाची दखल लंडन बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली आहे. अंदानी यांच्या रुपाने सामाजिक कार्याबद्दल लंडन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेले ते पहिले व्यक्ती ठरले आहे. सीए शंकर अंदानी यांना काही महिन्यांपूर्वी युनायटेड नेशन अमेरिका राष्ट्राध्यक्ष कार्यालयाकडून मेडल ऑफ एक्लन्स (उत्कृष्ट सेवा कार्याचा) सर्वोच्च आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला आहे. अंदानी यांना जवळपास दीड हजार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. ते शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान व अहमदनगर महानगरपालिकेचे मागील चौदा ते पंधरा वर्षापासून कर सल्लागार म्हणून काम पाहत आहेत. अनेक शासकीय संस्था व बँकचे ते लेखापरीक्षक न करसल्लागार आहेत.

लंडन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

स्कुटीच्या धडकेत पादचारी जखमी

। माणगाव । वार्ताहर ।

तालुक्यातील इंदापूर गावच्या हद्दीत ॲक्टिवा स्कुटीची धडक लागल्याने पादचारी व्यक्ती जखमी झाला. ही घटना दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबतची फिर्याद प्रकाश काळू गायकवाड (६३) रा. इंदापूर, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. या घटनेबाबत माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील आरोपी नितीन सीताराम वाढवळ, रा. कालवण, ता. माणगाव याने त्याच्या ताब्यातील ॲक्टिवा स्कुटी क्र. एम.एच. ०६ बी. झेड. ७३६५ ही अतिवेगाने चालवून मुंबई बाजूकडून माणगाव बाजूकडे जात असताना प्रमोद भिकू मोरे फिर्यादी (५५) रा. पानसई बौद्धवाडी, ता. माणगाव हे रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना त्यांना समोरून धडक दिली.

मातृसेवा फाऊंडेशनकडून मुलांना गणवेश वाटप

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त हद्दीतील सारसई ग्रामीण भागात मातृसेवा फाऊंडेशनच्या संस्थेकडून दुर्गम भागातील शाळेचा विकास करण्याचे काम हाती घेतले आहे. त्याची सुरुवात संस्थेच्या अध्यक्षा संध्या सावंत आणि दाते सुकुमार यांच्या हस्ते मुलांना प्रत्येकी अंगणवाडीतील ३० मुलांना दोन सेट गणवेश वाटून केले. तसेच शाळेच्या भिंतींवर लावण्यासाठी वेगवेगळे चार्ट्स देण्यात आले. उमेश लळीत यांनी चांद्रयानविषयक माहिती मुलांना दिली. जेणेकरून मुले रोज ते बघून शिकतील. तर, कराडे खुर्द प्राथमिक शाळेला वॉटर प्युरिफायर देण्यात आला. मुलांना शुद्ध पाणी मिळावे या हेतूने त्यांनी ती भेट शाळेला दिली असल्याचे संस्थेचे सदस्य संतोष शिंगाडे यांनी सांगितले.

दरम्यान, सारसई गावाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आम्ही शक्य ते प्रयत्न करू, असा विश्वास मातृसेवाचे ट्रस्टी मिलिंद नाईक यांनी दाखवला. अंगणवाडीत विजेची सोय करून द्यावी, अशी विनंती अधिकाऱ्यांना केल्याचे त्यांनी सांगितले.

झिराड शाळेतील विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा

। सोगाव । वार्ताहर ।

दी लाईफ फाऊंडेशन ही एक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी सामाजिक संस्था आहे. ही संस्था अलिबाग तालुक्यासह जिल्ह्यातील इतर भागातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आरोग्य आदीबाबत कार्यरत आहे.

संस्थेच्या वतीने राजिप शाळा झिराड येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात दंत चिकित्सक डॉ. अक्षय कोळी यांनी विद्यार्थ्यांना आपले दंत व मौखिक आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी विशेष असे मार्गदर्शन केले तसेच सर्व विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना दात व तोंड स्वच्छ ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी विशेष गरज असलेल्या विद्यार्थांना त्यांनी औषधे लिहून दिली. शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षकवर्गाने या शिबिरासाठी उपस्थित डॉ. अक्षय कोळी व शिबिराचे आयोजक दी लाईफ फाऊंडेशनचे विशेष आभार मानले.

यासोबतच हे दंत चिकित्सा शिबीर राजिप शाळा चोंढी आणि राजिप शाळा किहीम आदिवासीवाडी येथे घेण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

तारादीदींनी बांधली विशेष मुलांना राखी

। उरण । वार्ताहर ।

तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील विनायक येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळेच्यावतीने गुरुवार, दि.२४ रोजी उरण नगरपरिषदेच्या स्वतंत्र सैनिक दत्ता रहाळकर मैदान उरण बोरी येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम पार पडला.

स्वामी ब्रम्हानंद प्रतिष्ठान संचालित सीबर्ड असलेल्या विशेष मुलांना राख्या बांधून खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्रजापिता ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळा विनायक (केगाव) चे बी.के. विश्वासभाई यांनी केले होते. शाळेतील सुमारे ५० विद्यार्थ्यांना राख्या बांधण्यात आल्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयच्या पनवेल केंद्र प्रमुख बी.के. तारादीदी उपस्थित होत्या. तारादीदी यांनी शाळेतील मुलांना राखी बांधून थोडक्यात महत्त्व सांगितले. यावेळी बी.के. विश्वासभाई, रेशमा बहेन, शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये, स्टाफ, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

पोलिसांकडून मातीला नमन, वीरांना सलामी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

रायगड पोलीस मुख्यालय बँड पथकाच्यावतीने मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील मुरुड बाजारपेठ, काशिद समुद्र, मुरुड समुद्रकिनारी बँड वाजवून मातीला नमन करून वीरांना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी पोलीस निरीक्षक निशा जाधव, उपनिरीक्षक अविनाश पाटील, ट्रॅफिक सहाय्यक पोलीस फौजदार संतोष गायकवाड, ट्रॅफिक पोलीस नाईक किशोर बठारे, सहाय्यक फौजदार दिपक राऊळ, पोलीस नाईक परेश म्हात्रे, हवालदार लव गोंधळी, पोलीस शिपाई धनंजय पाटील, बांगर, होमगार्ड, पोलीस बँड पथक व नागरिक उपस्थित होते. पंतप्रधानांच्या संकल्पनेतून मेरी मिट्टी मेरा देश हे अभियान राबविले जात आहे. या माध्यमातून वीरांना नमन करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे, असे मत पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी व्यक्त केले.

कशेडी घाटामध्ये रसायनाचा टँकर कलंडला

▌अल्पावधीत वाहतूक सुरळीत

▌कशेडी टॅप पोलिसांचे यश

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर रायगड जिल्ह्यातील पोलादपूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यांच्या सीमावर्ती भागामध्ये शुक्रवार, दि. २५ ऑगस्ट रोजी ज्वालाग्रही रसायन वाहून नेणारा टँकर कलंडला. कशेडी टॅप पोलिसांना महामार्गावरील वाहतूक तातडीने सुरळीत करण्यात यश आल्याची माहिती कशेडी टॅपचे उपनिरिक्षक पी.एस. धडे यांनी दिली.

कशेडी घाटामध्ये गजानन महाराज मंदिराच्या अगोदर असलेल्या वळणावर उतारात टँकर (क्र. जीजे ०६ बीटी ७५५५) हा ब्रेक फेल होऊन रस्त्याच्या डाव्या बाजूस डाव्या कुशीवर कलंडल्याने महामार्गावरील वाहतूक खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ ठप्प ठेवण्यात आली. या टँकरमधील केमिकल (बीटीबीई) हे ज्वालाग्रही असून, थोड्या प्रमाणात गळती होत असल्याने या अपघाताची माहिती स्थानिक पोलीस ठाणे खेड व अग्निशमन खेड नगरपरिषद यांना कळविण्यात आल्याने सदर यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्याला सुरूवात केली. टँकर चालकाचे नाव जनक राज सिंग आनंद बहादुर सिंग असे असून (३२, रा. राजकुमारपूर, ता. जिगना, जि. मिर्झापूर, उत्तर प्रदेश) त्याला पाठीला व हाताला खरचटले आहे. या अपघातग्रस्त वाहनाचे नुकसान झाले असून, वाहन रस्त्यावरून बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात पोलिसांना अल्पावधीमध्ये यश आले.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. कै. नेहा महेंद्र गायकवाड, स्मरणार्थ अलिबाग

शब्दकोडे क्र.२२०



आडवे शब्द : १. बिनविषारी महासर्प, ३. कायमचे स्थान, ६. कुंतीचे दोन पराक्रमी पुत्र, १०. किंमत, ११. दार, १३. संगीतातील एक राग, १४. आमने सामने, १७. वजन, १८. लाकडाची एक उत्कृष्ट जात, १९. हिंदीत खत, २०. बहुमोल, २२. हाट, २३. कमळ, २५. रममाण, २७. कोवळी फांदी, २८. मोठा हातोडा, २९. लक्ष्मीचे एक नाव, ३१. मागणी, विनंती, ३२. प्रतिष्ठेचा अवयव, ३४. अव्यवस्थितपणा, ३६. जेमतेम, ३८. मन, विचार, ४०. शिखराचे टोक, ४१. ओले खोबरे, ४२. शेतातील आयुध, ४४. पाणी, ४५. दणकट, ४७. डाळीचे कालवण, ४८. वस्ती, ५०. आदरातिथ्य, ५२. बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दौर, ५४. एक गड्डा भाजी, ५७. रूक्ष, ५८. युद्ध, ५९. गायीचे पिल्लू, ६१. कर्ण, ६२. वर्दळ, गर्दी, ६३. बूड ६४. किंमतीतील वृद्धी, ६६. पुष्परस, ६७. मगज, फळातील खाद्यभाग, ६९. गुप्त हस्तक, ७०. सापाची एक जात, ७२. बाजेची कापडी पट्टी, ७५. कापडाचा एक जाडाभरडा प्रकार, ७६. मत देणे, ७७. मलई, ७८. रविवासर, ७९. साह्य.

उभे शब्द : १. अमावस्या, २. फुलांची माळ, ३. मृत्यु नसलेला, ४. दुसऱ्यासाठी खर्च करणे, ५. मूल्य, ६. गबाळा, ७. नजरफेक, ८. महाभारतातील शक्तीशाली गदाधर, ९. इच्छा दडपून टाकणे (वाक्प्रचार), १०. श्रीकृष्णाचे एक नाव, १२. तुळई, १५. आकर्षक, १६. श्रीकृष्णाचे द्रौपदीशी नाते, १७. अवधान, लक्ष, २१. छोटासा, २३. राष्ट्रगीतातील पहिले राज्य, २४. धाक, भीती, २६. सिद्धता, २८. ढग, दाट, ३०. घरातील मधली खोली, ३२. मत्स्य, मीन, ३३. गप्प बसणे, ३५. पशू, श्वापद, ३६. कौशल्य, ३९. टोळीचा प्रमुख, ४०. भांडण,४२. आगमन, प्रकट होणे , ४६. माहितगार, ४८. मिरवत नेणे, ४९. सर्वस्व, ५१. एक पालेभाजी, ५३. मैत्रिण, ५५. नवरदेव, ५६. प्रचंड, आरडाओरड, ५९. परिणामकारक (हिंदी), ६०. अस्थिर, ६४. हिंदुस्थान, ६५. बटु अवतार, ६८. ठराविक पैसे, ६९. सुवर्ण, ७१. पृथ्वी, ७३. घाव, प्रहार, ७४. सूर्याचे एक नाव, ७५. शंकर.

शब्दकोडे क्र.२१९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.नफा नुकसान ५.कसरत ८.समर ११.वाट १२.रखरखीत १३.अकारण १४.कपट १६.नराधम १८.गाल २१.कणीदार २३.तन २५.सम २६.पाडाव २७.सवड २९अ.भडंग ३०.पाव ३१.गणेश ३३.प्रवाळ ३४.रसवान ३६.मळ ३७.हत्याकांड ३८.मधुबाला ४०.दाणेदार ४२.सण ४३.आडवा ४५.ससा ४७.वाम ४८.गदा ४९.पंडित जवाहरलाल नेहरू ५३.समरस ५५.तर ५६.सजवा ५७.मना ५८.दमा ६०.बेकार ६२.नजर ७१.सावज ८०.खनन ८१.पात ८२.का ८३.मज ८४.रोज ८५.रामरस ८६.खेटर

उभे उत्तर : १.नवा २.फाटक ३.कलाटणी ४.नरवर ५.करवत ६.सखी ७.रतन ८.सकाम ९.मर १०.रणगाडा १३.अधम १५.पकडणे १७.रासगरबा १९.लवकर २०.वेस २२.दास २४.नभ २६.पावन २८.वगळणे २९.सवड ३०.पावा ३२.शहर ३३.प्रकांड पंडित ३५.सलाम ३६.मदार ३८.मण ३९.कंड ४१.दावेदार ४२.सरोज ४३.आमने ४४.वासरू ४५.सहज ४६.सारवान ४७.वाल ४८.गमनागमन ५०.तरबेज ५१.वासर ५२.हरकत ५३.सम ५४.सदरा ५९.माजघर ६१.कापा ६३.जनमानस ६४.रव ६८.कान ७०.नीर ७३.खाजरा ७४.साखर ७५.नंतर ७७.रम ७८.वीज ७९.साज ८१.पाट.

कानोकानी

शांतता कमिटीची गरज

तळा : आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी तालुक्यात सर्वधर्मीय शांतता कमिटीची गरज आहे. याठिकाणी विविध जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने या ठिकाणी नांदत आहेत. परंतु, काही समाजकंटकांमुळे वाद होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तरी, अनुभवी नागरिकांची मिळून शांतता कमिटी स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

ज्येष्ठांची आरोग्य तपासणी

नवी मुंबई : नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक संघ या सेवाभावी संस्थेच्या रुग्ण सेवा केंद्राच्या माध्यमातून ज्येष्ठांसाठी मोफत आरोग्य तपासणी सेवा नुकतीच सुरू करण्यात आली आहे. यावेळी डॉ. अवधूत विकास साठे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या शरीरस्वास्थ्यासाठी आपली मोफत रुग्णसेवा प्रदान केलेली आहे. रुग्णसेवा केंद्राचे अध्यक्ष रंजित दीक्षित यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साही वातावरणात हे शिबीर पार पडले.

पोलिसांचा बारवर छापा

पनवेल : पनवेलमधील क्रेझी बॉईज या लेडीज बारवर गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने शुक्रवारी रात्री छापा मारत बारमध्ये ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अश्लील हावभाव व अंगविक्षेप करणाऱ्या १९ महिला वेटर तसेच ४ कर्मचारी अशा एकूण २३ जणांना अटक केली आहे. नवी मुंबई शहरातील अनेक आर्केस्ट्रा बार व सर्व्हिस बार हे ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ चालवून नियमांचे उल्लंघन करत असल्याच्या तक्रारींनंतर पोलिसांनी छापेमारी करीत कारवाई केली.

मोरा जेट्टीवर असुविधा

उरण : मोरा जेटीवर प्रवाशांना सुविधा पुरवण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे. पावसाळ्यात तिकिटांचे ज्यादाचे दर आकारूनही सुविधांचा मात्र अभाव कायम असल्याची ओरड प्रवाशांकडून होत आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने बांधलेल्या जेट्टीची दुरवस्था झाली असून, जेट्टीला भगदाड पडले आहे; तर जेट्टीच्या फरशा अनेक ठिकाणी उखडल्या आहेत.

टोमॅटोचे दर घरसले

नवी मुंबई : गेल्या काही महिन्यांत बाजारात टोमॅटोच्या दराने उसळी घेतली होती, परंतु हळूहळू टोमॅटोचे दर आवाक्यात येण्यास सुरुवात झाली आहे. वाशी मुंबई कृषी उत्पन्न भाजीपाला बाजारात आवक वाढल्याने टोमॅटोच्या दरात १२ ते १४ रुपयांनी घसरण झाली आहे. घाऊक बाजारांमध्ये टोमॅटो २४ ते २८ रुपयांनी विक्री होत आहेत. एपीएमसी बाजारात सध्या सातारा, विटा, सोलापूर, पुणे, सासवड येथून टोमॅटोची आवक होत आहे.

साथीच्या आजाराची भीती; कचरा उचलला न गेल्याने परिसरात दुर्गंधी

खोपोलीत कचरा प्रश्न ऐरणीवर

। खोपोली । वार्ताहर ।

खोपोली शहरातील नागरी वसाहतीजवळील रस्त्याच्या बाजूला रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवत काही बाहेरील लोक रस्त्याच्या बाजूला कचरा टाकत असल्याचा आरोप अनेकदा करण्यात आला आहे. हा कचरा पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून वेळीच उचलला न गेल्याने परिसरात दुर्गंधी पसरून साथीच्या आजाराला आमंत्रण देण्यात येत आहे की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील स्थानिक रहिवासी व रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

खोपोली पालिकेतील दैनंदिन कामकाज व कारभाराबाबतीत नागरिकांमध्ये कमालीची नाराजी आहे. नगरपालिकेत लोकप्रतिनिधी नसल्यामुळे पूर्णपणे प्रशासकीय व अन्य कारभार मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्या एकतर्फी हातात असल्याने त्याचा प्रत्यय कर्मचारी वर्गासह नागरिकांना अनेकदा अनुभवायला आला आहे. तशी चर्चा पालिका कार्यालय व सर्वच स्तरावर ऐकायला मिळत आहे. रेल्वे स्थानकाकडून बहिरी मंदिरापासून बाजारपेठेला जोडणारा रस्ता कायमच कचऱ्याने व्यापला जात असून, या रस्त्यावर साचलेला कचरा वेळेत उचलला न गेल्याने तो पावसात कुजून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने येथील तसेच या रस्त्याने नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे पालिका प्रशासनाविरोधात सर्वत्र नाराजीचा सूर उमटू लागला आहे. हा रस्ता कायमस्वरूपी कचरामुक्त व्हावा, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.



> खोपोली नगरपालिकेचे लोकांच्या आरोग्याकडे लक्ष नसल्याचे अनेक गोष्टींमधून दिसून येते. भाजी मार्केटमध्ये मच्छी मार्केटचे पाणी येत आहे. त्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे भाजी मार्केटमध्ये कोणीही जात नाही आणि कोणी गेलेच तर त्याला त्या दुर्गंधीयुक्त पाण्यापासून तयार झालेल्या चिखलातूनच अख्खे भाजी मार्केट पायदळी तुडवावे लागते. तसाच प्रकार शहराच्या सर्वच रस्त्यांच्या बाबतीत दिसून येत आहे. रस्त्याच्या कडेला टाकलेल्या घाणीमुळे दुर्गंधी पसरण्यास सुरूवात झाली आहे. याकडे खोपोली नगरपालिकेच्या प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे अन्यथा साथीचे आजार पसरले जाऊ शकतात.
> – दिलीप पवार, खोपोली

परहूरपाडा केंद्राची शिक्षण परिषद संपन्न

। अलिबाग । वार्ताहर ।

तालुक्यातील परहूरपाडा केंद्राची शिक्षण परिषद राजिप शाळा मापगाव येथे शुक्रवार, दि. २५ ऑगस्ट रोजी पार पडली.

केंद्रप्रमुख अनिषा पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर चरी व कोपर शाळेचे स्पर्धेतील यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले. त्यानंतर पुस्तकातील कोऱ्या पानांचा उपयोग कसा करायचा, यावर शिक्षिका कुंदा पाटील यांनी मार्गदर्शन केले. दर्जेदार व्हिडिओ निर्मिती कशी करायची, यावर पूजा पाटील यांनी मार्गदर्शन केले. या शिक्षण परिषदेस गटशिक्षणाधिकारी श्री. पिंगळा यांनी भेट देऊन शिक्षकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्यासोबत सानध व्यक्ती रवींद्र वर्तक होते. विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास, सर्व चाचण्या तसेच शाळाबाह्य सर्व्हेक्षण, निरक्षर सर्वेक्षण, नवीन परिपत्रके यावर चर्चा झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचाल श्री. मोकल यांनी, तर सभेची सांगता श्री. गुरव यांनी आभार मानून केली.

माथेरानचा वडापाव आणि जॅकीचे ऋणानुबंध

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान या पर्यटन स्थळाच्या प्रेमात कोण पडणार नाही? असा निसर्ग माथेरानला मिळाला आहे. वर्षातील तिन्ही ऋतूमध्ये येथील निसर्ग वेगवेगळी रूपे परिधान करुन अनेकांना आपल्या प्रेमात पाडतो. हाच निसर्ग आणि माथेरानमधील कदम टी स्टॉलमधील बटाटा वडा प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ यांच्या आवडीचा बनला आहे. दरम्यान, कदम यांचा बटाटावडा आणि जॅकी श्रॉफ यांचे ऋणानुबंध गेली ४० वर्षे कायम असून, आता कदम टी स्टॉलच्या दुसऱ्या पिढीसोबतही जॅकी स्नेह जपत आहेत.

माथेरान येथे पर्यटनासाठी आलेले जॅकी श्रॉफ यांची लक्ष्मी हॉटेलचे मालक मुकेश मेहता यांची ओळख झाली. त्यानंतर मुकेश मेहता यांनी जॅकी श्रॉफ यांना घेऊन माथेरानचे आराध्य

दुसऱ्या पिढीशीही जपलेय नाते

दैवत असलेल्या श्री पिसारनाथ महाराज यांच्या मंदिरात नेले. मंदिरात काही वेळानंतर जॅकी श्रॉफ हे ४० वर्षांपूर्वी मंदिराच्या समोर असलेल्या कदम टी स्टॉल या पत्र्याच्या भिंती असलेल्या चहाच्या दुकानात जाऊन बसले. मात्र, या टी स्टॉलचे मालक लक्ष्मण कदम यांनी पिक्चरमध्ये दिसणाऱ्या हिरोला पाहून बटाटा वडा खाण्याचा आग्रह केला. त्या दिवसापासून बटाटा वड्याच्या प्रेमात अभिनेते जॅकी श्रॉफ पडले आहेत. ते कधीही माथेरानमध्ये आले की, पिसारनाथाचे दर्शन घेण्यासाठी जायचे आणि त्यानंतर कदम यांना आवाज देऊन वडापाववर ताव मारायचे, अशा पद्धतीने सुरू झालेली परंपरा आजही कायम आहे.

आज लक्ष्मण कदम या जगात नसले तरी त्यांची मुलगी मेघा यांच्यासोबतदेखील लहानपणापासून ऋणानुबंध निर्माण झाल्याने जॅकी अगदी आपल्या कुटुंबातील व्यक्तीसारखे कदम टी स्टॉलमधील सर्वांची विचारपूस करीत असतात. जॅकी यांनी कदम टी स्टॉलसोबत ४० वर्षांपासून जपलेला ऋणानुबंध आजच्या धकाधकीच्या जीवनात कायम जपला असल्याचे दुर्मिळ उदाहरण यानिमित्ताने कदम कुटुंबियांनी अनुभवले.

दरम्यान, जॅकीसोबत असलेल्या चार जणांनी तब्बल १४ वडे खाल्ले आणि आलं घातलेला चहा घेऊन तेथून निघाले. त्यामुळे कदम टी स्टॉलमधील बटाटावडा हा त्यांच्या त्या दिवसाचा आहार होता, असे ऋणानुबंध जॅकी यांनी जपले असल्याचे त्यांचे मित्र जॅकी नजे सांगतात. त्यामुळे माथेरानमधील निसर्ग, माथेरान आराध्य दैवत आणि माथेरानचा बटाटावडा या तिघांचे महत्त्व अभिनेते जॅकी श्रॉफ यांच्या जीवनात महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

पेट्रोल पंपांवरील सेवांचे तीनतेरा

। उरण । वार्ताहर ।

पेट्रोल पंपावरील सेवा बेपत्ता झाल्या असून, ग्राहकांची त्यामुळे गैरसोय होत आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागातही सध्या मोठ्या प्रमाणात पेट्रोल पंप सुरू करण्यात आले आहेत. मात्र, नव्या आणि जुन्या अशा सर्वच पेट्रोल पंपांवर निर्धारित सुविधांचा अभाव पाहायला मिळत आहे.

पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, अग्नीरोधक यंत्रणा, तक्रार निवारण पुस्तिका, प्रथमोपचार पेटी आणि हवेची सुविधा यांची वानवा पेट्रोल पंपावर दिसत आहे. याकडे प्रशासन, पंपचालक, मालक आणि कंपनीचे विक्री अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने ग्राहकांची हेळसांड होत आहे.

पंपावरील स्वच्छतागृहे, तसेच अन्य काही सुविधांना शासन पेट्रोल पंप चालकांना अनुदान देत असते. त्यामुळे ग्राहकांसाठी सुविधा निर्माण करणे बंधनकारक असतानाही याकडे पेट्रोल पंप चालक दुर्लक्ष करत आहेत. काही ठिकाणी पंपावरील कर्मचाऱ्यांनाच या सुविधांची माहिती नसते, तर काही ठिकाणी केवळ शासनाची सक्ती आहे म्हणून स्वच्छतागृह बांधून ठेवले आहेत. त्याचा वापर केला जात नाही. काही ठिकाणी केवळ कर्मचारीच त्यांचा वापर करीत आहेत.

ग्राहकांना त्यांची माहिती देणारे फलक लावलेले नाहीत. महामार्गावरील काही पंपावर सुविधा आहेत. मात्र, त्या दिल्या जात नाहीत, तर शहरातील पंपावर सुविधा आहेत. मात्र, अडचणीच्या ठिकाणी आहेत. त्या शोधूनही सापडत नाहीत अशा ठिकाणी असतात. त्यामुळे ग्राहकांचे फार हाल होत आहेत. स्वच्छता कोणी करायची म्हणून स्वच्छतागृहांना कुलूप ठोकलेले असते. पेट्रोल पंपावर स्वच्छता, ग्राहकांसाठी पिण्याचे पाणी असणे बंधनकारक आहे. मात्र, बहुतांशी ठिकाणी पिण्याचे पाणी ठेवलेले नाही. असेलच तर ते कर्मचाऱ्यांसाठी ठेवलेले असते. अशा सुविधा नेमक्या कोणासाठी असतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रोह्यात शेतकऱ्यांना प्रशिक्षण

। खांब । वार्ताहर ।

दिपक फाऊंडेशन रोहा व दिपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने ग्राम जल संचय प्रकल्पातून लाभ देण्यात आलेल्या शेतकऱ्यांचे रोहा येथे प्रशिक्षण मोठ्या उत्साहात पार पडले.

शेतकऱ्यांसाठी विशेषतः ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेला ग्राम जल संचय प्रकल्पांतर्गत ९४ शेतकऱ्यांना आंबा, नारळ, साग, बांबू यासह खते असे लाभ देऊन फळबागांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच२५ शेतकऱ्यांकडे शेततळी करण्यात आली आहेत. उर्वरित ६५ शेततळेदेखील या वर्षात करण्यात येणार आहेत. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी मोठा लाभदायक ठरत असून, या प्रकल्पांतर्गत तालुक्यातील सुमारे २० गावांतील शेतकऱ्यांना याचा फायदा झाला असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकल्पातून सर्व शेतकऱ्यांचे फळबाग वाडी याविषयी प्रशिक्षण पार पडले. प्रशिक्षणासाठी कृषी विज्ञान केंद्र किल्ला येथील डॉ. मांजरेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी दीपक फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक अजय आवाडे, प्रकल्प समन्वयक प्रवीण ठोसर, सुपरवायजर रोशन जाधव, प्रतिक मारणे उपस्थित होते.

नांदगाव विद्यालयात फिरती प्रयोगशाळा

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे स्व रूपवर्धिनी विज्ञान तंत्रज्ञान फिरते प्रयोगशाळा पुणे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी फिरती प्रयोग शाळेतील तज्ज्ञ संशोधकाकडून नांदगाव विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधत असताना विद्यार्थ्यांना हवेचा दाब, गणिती आकडेमोड, निरीक्षण शक्ती विकसित करणे, रोबोटिक एफ वन मोटार बनवण्याचे तंत्र, रक्तदाब, वजन आवाजाचे मोजमाप करण्याच्या पद्धती, मूलद्रव्याची आधुनिक आवर्त सारणीची ओळख करून दिली. तसेच

प्रयोगाच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

संशोधक डॉ. सुहास काने यांनी अंटार्टिका खंडाची केलेली सफर तेव्हा आलेले अनुभव, आव्हाने, प्रसंग स्लाईड शोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखविले. तसेच शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या सहवासात असताना आलेले अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

या फिरती प्रयोगशाळेबरोबर डॉ. सुहास काने संशोधक, डॉ. प्रमोद खांडेकर कावीळ लस विकसक, सुरेश गोखले संस्थेचे सचिव, प्रभुदास घरत सहसचिव, विश्वासराव कुलकर्णी कार्यकारी अध्यक्ष, रविकांत पाटील प्रयोगशाळा व्यवस्थापक, चंदन दाबी प्रचारक, बापू शिंदे विज्ञान मार्गदर्शक, हेमंत देसाई उपस्थित होते. या सर्व तज्ज्ञ मार्गदर्शकांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने प्रा. संभाजी ढोपे यांनी विशेष आभार व्यक्त केले.

माथेरानमधील रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील अनेक विभागातील रस्त्यांवरील विजेचे दिवे बंद अवस्थेत असल्याने येथील बहुसंख्य रस्त्यांवर अंधार दाटलेला दिसून येत आहे. पालिकेच्या दुर्लक्षामुळे येथे पंचवटी विभागातील रस्तेदेखील अंधारात गुडूप झाले आहेत. त्यामुळे येथील नागरिकांना काळोखातून वाट काढावी लागत आहे.

पावसाळ्यात पडणारा मुसळधार पाऊस, दाट धुके आणि येथील गर्द वनराई यामुळे माथेरान शहरात या दिवसांत दिवसादेखील थोडा अंधार जाणवतो. अशात सायंकाळनंतर येथील रस्त्यांवरील पथदिवे महत्त्वाची भूमिका बजावतात, परंतु माथेरान शहरातील अनेक विभागांतील पथदिवे बंद अवस्थेत आहेत. यापैकी येथे पंचवटी नगर परिसरातील पथदिवेदेखील मागील दोन महिन्यांपासून बंद असून, येथील नागरिकांना दररोज काळोखातून वाट काढावी लागत आहे.

पथदिव्यांअभावी अंधारातून चालताना येथे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सध्या माथेरान पालिकेत प्रशासकीय राजवट असून, प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. येथे पूर्ण वेळ मुख्याधिकारी नसल्याने मोठी गैरसोय होत आहे. प्राथमिक सुविधा देण्यात नगरपालिका अपयशी ठरत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक येथे करीत आहेत.

शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। कर्जत । प्रतिनिधी ।

तिरुपती बालाजी मित्र मंडळ सांगवी आयोजित माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने फार्मसी महाविद्यालयात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २२५ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन गीता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. माजी सरपंच मधुकर घारे, ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, सुर्वे प्रतिष्ठानचे मुकेश सुर्वे, तिरुपती बालाजी मित्रमंडळाचे अध्यक्ष जगदीश देशमुख, सरपंच प्रमोद देशमुख, बंडू तुरडे, मनोहर पवार आदी उपस्थित होते. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणीशंकर गुप्ता यांच्यासह पंधरा डॉक्टर आणि दहा आरोग्यसेवक यांनी आरोग्य सेवा दिली. चामखीळ आणि भोवरी हे तत्काळ काढण्यात आले तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा करण्यात आली. बहिरेपणा, सांधे दुखी, कंबर दुखी, गुढघे दुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. २२५ रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बिल्डींग मटेरीयल दुकानात टॅलीचा** अनुभव असलेली मुलगी पाहिजे. पगार : १५०००/- मो. ८००७८९३२३२/८००७९९३२३२
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.हॉटेल मॅनेजर, २.रेस्टॉरंट व किचन मॅनेजर, ३.हाऊस किपर, ४.वेटर, Reception ६.ज्यूस काउंटरसाठी माणूस. २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५
- **अलिबाग वरसोली हम रस्त्यावर** गर्गवरद सोसायटीमधील १६०० स्के.फुटचे रो हाऊस त्वरीत विकणे आहे. मो. ९४२३८९०२०१/९३२४९८३७८५
- **अलिबागमध्ये एस.टी.स्टँडजवळ** ब्राम्हणआळीत पहिल्या मजल्यावर (स्वतंत्र जिना असलेले) रेडी पझेशन वाणिज्य गाळे विकणे/भाड्याने देणे आहेत. संपर्क : ९६५७९१७४००/७२७६५९१३०२
- **अलिबाग-उसर रस्त्यावर नऊ किलोमीटरवर** वढाव खुर्द येथे गावठाणनजीक ३० गुंठे शेतजमिन विकणे आहे. भरपूर पाणी व बांधकाम परवानगी उपलब्ध. संपर्क :- ७२७६५९१३०२/९६५७९१७४००

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

मिणमिने कुटुंबाची बांबूपासून आकर्षक मखरांची निर्मिती

पर्यावरणपूरक मखरांना वाढती मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

लाडक्या बाप्पाचे आगमन काही दिवसांवर आले असून, सजावटीचे साहित्य घेण्यासाठी बाजारात भक्तांची गर्दी वाढू लागली आहे. विविध प्रकारच्या साहित्याने बाजारपेठा सजल्या आहेत. थर्माकोल बंद झाल्यानंतर सर्वत्र पर्यावरणपूरक सजावटी तयार करण्यास सुरुवात झाली.आता तर कागदापासून तसेच बांबूच्या काठ्यांपासून आकर्षक मखर बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यात कर्जत तालुक्यातील अंजप गावातील मिणमिने कुटुंबाने आपला छंद जोपसण्यासाठी बांबूच्या काठ्यांपासून मखर बनविण्यास सुरुवात केली असून, आज पाच वर्षांपासून आपल्या आवडत्या छंदाचे व्यवसायात रूपांतर केले आहे.



गणेशोत्सव १७ सप्टेंबरपासून असल्याने शेतीची कामे उरकल्यावर मिणमिने कुटुंबाकडून पर्यावरणपूरक मखर बनविण्यास सुरुवात झाली. गेली दीड महिना हरिचंद्र मिणमिने हे पत्नी भारती आणि मुलगे राज, आदित्य यांच्या मदतीने पर्यावरणपूरक मखर बनवत आहेत. त्यात हरिचंद्र मिनमिने आपली नोकरी सांभाळून मखर बनविण्याचे काम करता. त्यांनी आतापर्यंत ४० मखर बनवून तयार केली आहेत. मागील काही वर्षात त्यांच्या मखरांना कल्याण, डोंबिवली, कर्जत तालुका तसेच बलादपूर आदी भागातून मागणी वाढत आहे. साडे तीन ते सहा फूट आकाराचे मखर मिणमिने कुटुंबियांनी साकारल्या आहेत.

किमान दोन वर्षे वापरता येईल

सिंहासन, डबल मजली वाडा, मंदिर, खेकडा आदी साकारल्या आहेत. पर्यावरणपूरक मखर असल्याने या मखरांना गणेशभक्त किमान दोन-तीन वर्षे वापरू शकतात.

प्रदूषणमुक्त...

संपूर्ण सजावट ही पर्यावरणपूरक असल्याने काही मिनिटात नष्टदेखील होऊ शकते. त्याचवेळी त्या मखराच्या साहित्यात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण करणारे साहित्य नाही.

नवभारत साक्षरता अभियान सर्वेक्षणावर

प्राथमिक शिक्षकांचा बहिष्कार

। माणगाव । प्रतिनिधी ।

गेली दोन महिने शैक्षणिक कामे, ऑनलाईन माहिती व नवभारत साक्षरता अभियान सर्वेक्षण या सर्व विषयांनी शिक्षक बंधू-भगिनी त्रस्त झाले आहेत. त्याचा परिणाम विद्यार्थी गुणवत्तेवर होत होता, तसेच शिक्षकांचेदेखील मानसिक, शारीरिक स्वास्थ्य कमालीचे बिघडले होते. या प्रकाराबद्दल शिक्षकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली होती. प्रत्येक शिक्षक बांधवांनी ते ज्या शिक्षक संघटनेचे सदस्य आहेत, त्या संघटनेच्या पदाधिकाऱ्याकडे अशैक्षणिक कामे, ऑनलाईन माहिती तसेच नवभारत साक्षरता अभियान सर्वेक्षण या सर्व कामावर बहिष्कार घालावे, अशी मागणी करीत होते. आपल्या सर्वांची व्यथा व भावना लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने नवभारत साक्षरता अभियान सर्वेक्षण व अशैक्षणिक कार्य यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतलेला आहे, असे मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे यांनी सांगितले आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षांमध्ये शाळा १५ जून रोजी सुरू झाली यामध्ये सुरुवातीपासूनच प्रवेशोत्सव, प्रवेश दिंडी १ जुलै ते २५ जुलै सेतू अभ्यासक्रम पूर्व चाचणी, तीन दिवस उत्तर चाचणी, तीन दिवस अध्ययन स्तर चाचणी, २१ जुलै ते २० ऑगस्ट घरोघरी जाऊन मतदार नोंदणी, त्याचबरोबर दि. १७ ते १९ ऑगस्ट पायाभूत चाचणी व त्याचा निकाल तयार करणे, दि. २१ ते ३१ ऑगस्ट निरक्षर सर्वेक्षण, दि. १ ते १५ सप्टेंबर स्वच्छता सप्ताह. हे सर्व जबाबदारी प्राथमिक शिक्षकांवर दिल्या गेल्या आहेत, तसेच नुकतेच शासनाने शैक्षणिक सर्वेक्षणाच्या नावाखाली फार मोठे अशैक्षणिक काम राज्यातील शिक्षकांवर लादलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व शासन निर्णयानुसार राज्यातील जि.प./न.प. व मनपा अंतर्गत प्राथमिक शाळांमधील शिक्षकांना कोणतेही अशैक्षणिक कामे देऊ नये. फक्त निवडणुका व जनगणना यासारखी राष्ट्रीय महत्त्वाची कामे देणे असल्यास सुट्टीच्या दिवशी व अशैक्षणिक कालावधीत देण्यात यावीत. असे असतानाही शासन/प्रशासनाकडून अनेक अशैक्षणिक कामे शिक्षकांकडे जबरदस्तीने देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा, त्यांच्या शैक्षणिक नुकसानीचा व शिक्षकांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार होतच नाही. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी काम करू द्यावे व कोणत्याही अशैक्षणिक कामासाठी आमच्या प्राथमिक शिक्षकांचा वापर होऊ नये, अशा प्रकारची व्यवस्था निर्माण व्हावी, अशी माफक अपेक्षा शासनाकडून आहे. अगोदरच राज्यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या तीस हजारांवर जागा रिक्त आहेत. त्याचाही परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. दर नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षण अंतर्गत शैक्षणिक सर्वेक्षणाच्या नावाखाली आवश्यक सर्वेक्षणाचे काम शिक्षकांकडून करून घेण्याची शासनाची भूमिका आहे. त्यामुळे सबब आम्ही राज्यातील सर्व शिक्षक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास प्राधान्य देत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना म्हणून राज्यातील सर्व संघटनांकडून ह्या नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षणावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर सर्वेक्षणावर बहिष्कार टाकत असल्याबाबतचे पत्र मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे व मा. शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य पुणे यांना देण्यात आलेले आहे. या सदर नवभारत साक्षरता कार्यक्रम सर्वेक्षणाचे काम राज्यातील कोणीही शिक्षक करणार नाही. या सर्वेक्षणाच्या कामावर राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांचा बहिष्कार आहे, असे मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे यांनी सांगितले आहे.

श्रीवर्धनमध्ये नृत्य स्पर्धा

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रावण महिन्यात महिलांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी श्रीवर्धन तालुका व शहर यांच्यावतीने दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजता श्रीवर्धनच्या कुळकर्णी हॉलमध्ये श्रावणसरी नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत प्रथम क्रमांकास रु. दहा हजार व सन्मानचिन्ह, द्वितीय व तृतीय क्रमांकांस अनुक्रमे रु. सात हजार व रु. पाच हजार आणि सन्मानचिन्ह, तसेच उत्तेजनार्थ क्र. एक व दोन यांस रु. दोन हजार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी प्रविता माने, श्वेता पेटकर, वृत्तिका हावरे व शिवानी चेवले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आदिवासी संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात आदिवासी समाज मोठ्या संख्येने वस्ती करून राहात आहे. समाजाशी निगडित असलेले असंख्य प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासी ठाकूर समाज संघटना पुढाकार घेत असते. समाजाकडे येणारे प्रश्न एकाच ठिकाणी दिले जावेत आणि त्यांचे समाजापुढे एकमत होऊन मार्ग काढण्याचे काम व्हावे यासाठी कर्जत तालुका आदिवासी ठाकूर संघटनेने आपले कार्यालय कशेळे येथे सुरु केले आहे.

कर्जत तालुक्यात १९८४ साली आदिवासी ठाकूर समाज संघटनेची स्थापना झाली असून, अद्यापपर्यंत संघटनेचे अधिकृत असे कोणतेही कार्यालय सुरु झाले नाही. कशेळे या मध्यवर्ती ठिकाणी आदिवासी संघटनेने एक जागा भाड्याने घेतली आहे. त्या ठिकाणी कर्जत तालुका आदिवासी संघटना अध्यक्ष परशुराम दरवडा, महिला अध्यक्ष जयवंती हिंदोळा यांच्या हस्ते कार्यालय सुरु करण्यात आले. या कार्यालयासाठी भास्कर दिसले, ऋषीकेश राणे यांनी एक टेबल आणि १० खुर्च्या भेट दिल्या. तर उमरोली ग्रामपंचायत सरपंच ठमीबाई नामदेव सांबरी यांच्याकडून पाच खुर्च्या, एक कपाट देण्यात आले. कशेळे गावातील सचिन राणे यांच्याकडून भिंतीवरील घड्याळ तर गणपत सांबरी, किरवली सरपंच संतोष सांबरी यांच्याकडून पंखे देण्यात आले. तसेच या कार्यालयासाठी लागणारे महिन्याचे भाडे तालुक्यातील आदिवासी कार्यकर्त्यांकडून वर्गणीतून भरले जाणार आहे.

जयवंत वाणींचा सेवापूर्ती समारंभ

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

नागाव केंद्राचे केंद्रप्रमुख जयवंत वाणी पस्तीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. त्यांचा निरोप समारंभ नवेदरबेली येथील शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून त्यांना शाल,श्रीफळ, भेटवस्तू आणि सन्मानपत्राने गौरविण्यात आले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे रायगड जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, शिक्षक पतपेढी संचालक वैभव पिंगळे, केंद्रप्रमुख विश्वजित म्हात्रे, गणेश पाटील, संतोष गावंड, महेश कवळे, मारुती निळकर, संदीप वारगे, धनंजय म्हात्रे, संजय पोईलकर, दीपा फाळके, नागाव प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका भावेश्री वाळंज, ज्योती वाणी, अभियंता चिरंजीव प्रतीक वाणी, देवानंद गोगर, विनायक थळकर, हेमंत गुंडा, सुरेश खडपे, हेमंत म्हात्रे, जगदीश चवरकर, रमेश धुमाळ, साधनव्यक्ती रवींद्र वर्तक, मेघा मगर व वर्तक मॅडम आदी उपस्थित होते.

गोखले महाविद्यालयात 'श्रावणसरी'

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, तसेच त्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी 'श्रावणसरी' या काव्यवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालय मराठी विभाग आणि कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी होते. प्रमुख अतिथी म्हणून सीमा रिसबूड, शर्मिला जोशी, अनिता कांबळे, माजी प्रा. आनंद जोशी, उपप्राचार्य किशोर लहारे, डॉ.वाल्मिक जोंधळे, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

श्रावण गीत गाऊन या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मृण्मयी भुसाणे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवज्योत जावळेकर यांनी केले. या कार्यक्रमात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकूण १९ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व प्राध्यापकांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य शांतीलाल जैन, राजेंद्र भोसले व नितीन सुर्वे यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

'इनरव्हील'कडून मोफत नेत्रतपासणी

कर्जत : इनरव्हील क्लब व सखी ग्रुपच्यावतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पाटील ऑप्टीशियनच्या वतीने तपासणी करण्यात आली. यावेळी इनरव्हील क्लबच्या उत्तरा वैद्य, प्राची चौडिए, वनिता सोनी, सुलोचना गायकवाड, करुणा पराडकर, सुप्रिया गिरी, वैशाली दांडेकर आदी सदस्या उपस्थित होत्या. यावेळी ७५ व्यक्तींनी आपली नेत्रतपासणी करून घेतली.

श्रीवर्धन, महाड मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला

। माणगाव । प्रतिनिधी ।

काँग्रेस पक्ष हा गोरगरीब, कष्टकरी जनसामान्यांचा पक्ष आहे. या पक्षाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. सर्वधर्मसमभाव मानणारा हा पक्ष असून, सर्वांना सोबत घेऊन त्यांचे प्रश्न, अडचणी समजावून घेत मदत करणारा पक्ष आहे. श्रीवर्धन, महाड विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. तो आजही निष्ठावंतामुळे मजबूत आहे, असा ठाम विश्वास काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष पंकज तांबे यांनी माणगाव तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत बोलताना दिला.

आढावा बैठकीत पंकज तांबेंनी दिला विश्वास

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या माणगाव येथील जनसंपर्क कार्यालयात तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दि. २६ ऑगस्ट रोजी जिल्हा उपाध्यक्ष पंकज तांबे, माणगाव तालुकाध्यक्ष विलास सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी डॉ. नरेंद्र सिंग, तळा तालुकाध्यक्ष श्री. भोसले, तालुका सरचिटणीस मंदेश मोरे, सुनीलदत्त चव्हाण, विठ्ठल शिंदे, गोरेगाव विभागीय अध्यक्ष सरफराज उमलकर, मजफर उर्जुफ आदी उपस्थित होते.

ठाकरे गटाच्या भाई शिंदेंविरोधात आदिवासी आक्रमक

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप जाहीर झाल्या नसल्या तरी राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. खानाव ग्रामपंचायतीचे सरपंचपद अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी आरक्षित असून, येथील आदिवासीवाडीने एकमताने बिनविरोध एकच उमेदवार द्यायचा निर्णय घेतला असताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष भाई शिंदे यांनी धमकावून जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप केला आहे. आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने खालापूर पोलीस ठाणे गाठून भाई शिंदे, अंकुश शिंदे यांच्याविरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी आदिवासी बांधवांनी भाई शिंदे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजीही केली.

खालापूर तालुक्यातील खानाव ग्रामपंचायतीची मुदत संपली असून, कोणत्याही क्षणी येथे निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. या ग्रामपंचायतीचे थेट सरपंचपद अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी आरक्षित झाले आहे. त्यामुळे येथील आदिवासी बांधवांनी एकच उमेदवार द्यायचा निर्णय घेतला असून, शिवसेना ठाकरे गटाचे नेते भाई शिंदे यांनी याचा राग मनात धरून जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप तुळाजी गोविंद भोईर यांनी केला आहे. भाई शिंदे त्यांचे बंधू आणि माजी सरपंच अंकुश शिंदे यांनी जातीवाचक शिवीगाळ आणि दमदाटी केल्याने या दोघांच्या विरोधात ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी तुळाजी भोईर यांनी केली आहे. दरम्यान, याबाबत विचारणा करण्यासाठी भाई शिंदे यांच्याशी फोन केला असता संपर्क होऊ शकला नाही. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

> तुळाजी भोईर आणि अन्य आदिवासी बांधव येथील झोराबियन कंपनीत काम करतात त्यांनाही धमकावून कामावरून कमी करण्याची भीती दाखवली जात असून, कंपनीचा कर्मचारी सदाशिव निमले हादेखील दमदाटी आणि जातीवाचक शिवीगाळ करत असल्याने त्याच्यावरही कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.
> – तुळाजी भोईर, तक्रारदार

कोण आहेत भाई शिंदे?

भाई शिंदे शिवसेना ठाकरे गटाचे नेते आहेत. रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपदही त्यांनी भूषवले असून, खानाव ग्रामपंचायतीवर भाई शिंदे यांचे तीस वर्षे एकहाती वर्चस्व असताना आदिवासी बांधवांनी थेट आरोप करून भाई शिंदे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केल्याने खालापूर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

खोपोली नगरपरिषद
KMC
खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीन कोड नं. ४१० २०३
फोन नं. (०२१९२)२६२२२२, २६३३५६, २६४२११,
जा.क्र.के.एम.सी./मिळकत विभाग/१८८४ दिनांक : २४/०८/२०२३

मिळकत विभाग
ई-निविदा सूचना सन २०२२-२३

खोपोली नगरपरिषद मिळकत विभागाकडील ई-निविदा सूचना क्र. १ खोपोली नगरपरिषदेच्या हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय शेजारील जागा २ चाकी व ४ चाकी वाहने उभी करणेसाठी पार्किंग ठेका पद्धतीने देणे. या कामासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या तसेच शासन निर्णयाप्रमाणे इच्छुक ठेकेदाराकडून ब-१ नमुन्यातील द्विलिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. २८/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० नंतर उपलब्ध होईल.

सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

सही/-
मुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद
खोपोली नगरपरिषद

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक चेतन वेलजी देधीया यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
३६	३	०-१२-९०	०-०९

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २८/०८/२०२३

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

संजीव वानखेडे यांचा सत्कार

। वेणगाव । वार्ताहर ।

इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर चांगली कामगिरी करणाऱ्या उपअभियंता संजीव वानखेडे यांचा कर्जत ठेकेदार संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

मुसळधार पावसात बेघर झालेल्या ग्रामस्थांच्या पुनर्वसनाचा गंभीर प्रश्न होता. परंतु महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा खाते, पोलीस खाते यांच्या संयुक्त प्रयत्नाने आठ दिवसात चौक गावाजवळ कंटेनर रूम, काँक्रिट रस्ते, संडास, बाथरुम, नळ पाणीपुरवठा, अंघोळीसाठी गरम पाण्याचे गिझर याची व्यवस्था करण्यात आली.

रायगड सा. बां. मंडळाच्या अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांनी मदत पुनर्वसन कार्यात मोलाची कामगिरी बजावणारे कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता संजीव वानखेडे यांच्यासह अभियंता अक्षय चौधरी, रोहित थोरात, मोहन पाटील, कर्मचारी अजय पवार, जनार्दन खंडागळे यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनीही संजीव वानखेडे यांना सन्मानपत्र देऊन सत्कार केला. दरम्यान, कर्जत तालुका ठेकेदार संघटनेच्या वतीने उपअभियंता वानखेडे, अक्षय चौधरी, मोहन पाटील, अजय पवार, जनार्दन खंडागळे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी ठेकेदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सत्काराला उत्तर देताना संजीव वानखेडे यांनी सर्वांचे आभार मानले.

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
ई- निविदा सूचना क्र. ०८, बांधकाम विभाग
दिनांक २८/०८/२०२३ ते ११/०९/२०२३ पर्यंत शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
ई- निविदा सूचना क्र. ०६, बांधकाम विभाग
दिनांक २८/०८/२०२३ ते ११/०९/२०२३ पर्यंत शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
ई- निविदा सूचना क्र. ०७, बांधकाम विभाग
दिनांक २८/०८/२०२३ ते ०४/०९/२०२३ पर्यंत शासनाच्या www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. नेहल किशोर मेहता व श्री. मनिष किशोर मेहता यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे- आंबिवली त. कोतलखलाटी तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
६१/३/अ	०-५८-५०	०-३८
६३/५/ब	२-१३-००	१-३७
६३/६	०-३८-००	०-३७

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २८/०८/२०२३
मोबा. ९८२२६९११०९

ॲड. निलेश कान्हू मोरे
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. संदिप भुपेंद्रनाथ गंभीर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

मौजे- गौळवाडी तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)
४५/२/ब	०-८९-००	०-४४
४५/४	०-३९-००	०-२८
४५/५	०-२१-००	०-१२
४५/६	०-१९-००	०-०९
४५/७	०-३१-००	०-२५
४५/८/ब	०-२५-००	०-१८
४५/८/अ	०-२५-००	०-१८
४५/१०/अ	०-३१-००	०-३६
४५/१०/ब	०-६४-००	०-३६

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २८/०८/२०२३
मोबा. ९८२२६९११०९

ॲड. निलेश कान्हू मोरे
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, आमराई रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

क्षणचित्र

प्रेक्षकांमध्ये हाणामारी

कोलंबो : पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात खेळल्या गेलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात स्टेडियममध्ये गदारोळ झाला. सामना खेळला जात असताना दोन चाहत्यांचे भांडण झाले. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात झालेल्या सामन्यात प्रेक्षकांमध्ये हाणामारी झाली होती. गेल्या आशिया कपमध्येही स्टेडियममध्ये दोन्ही संघांच्या समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला होता.यामुळे खेळ थांबला होता.

सौद शकीलचा समावेश

कराची : आशिया चषक स्पर्धा सुरू होण्यापूर्वी पाकिस्तान संघाने आपल्या संघात मोठा बदल केला आहे. आता एका राखीव खेळाडूला मुख्य संघात संधी मिळाली आहे. मधल्या फळीतील फलंदाज सौद शकीलचा पाकिस्तानच्या आशिया कप संघात समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर तय्यब ताहिरला राखीव म्हणून ठेवण्यात आले आहे. शकील सुरुवातीच्या संघाचा भाग नव्हता.

राहुल,श्रेयसचा मार्ग खडतर

नवी दिल्ली : अजूनही लोकेश राहुल आणि श्रेयस अय्यर यांची चाचणी घेण्यात आलेली नाही आणि ती लवकर होणार नसल्याचे समजते आहे. जोपर्यंत खेळाडूची शारीरिक चाचणी होत नाही तोपर्यंत तो खेळू शकत नाही. राहुलने नेट्समध्ये थोडा फलंदाजीचा सराव केला, पण त्याने धावण्याचा सराव मात्र केला नाही. राहुल अजून पूर्णपणे तंदुरुस्त झालेला नाही, त्यामुळे तो या आशिया चषकात खेळेल असे वाटत नाही.

लिटन दास दुखापतग्रस्त

ढाका : बांगलादेशचा फलंदाज लिटन दास आजारपणामुळे आशिया चषक स्पर्धेत सहभागी होणार नाही. बीसीबीच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. त्यामुळे आता पुन्हा संघाच्या अडचणी वाढल्या आहेत. दुखापतग्रस्त इबादत हुसेनच्या जागी समाविष्ट केलेला युवा वेगवान गोलंदाज तनझिम हसन शाकिब हा देखील संघासोबत प्रवास करणार नाही. त्याचे तिकीट अद्याप निश्चित झालेले नाही.

दिव्यांग क्रिकेटरला अटक

लखनौ : उत्तर प्रदेशमधील शिष्यवृत्ती घोटाळा प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचं प्रतिनिधिक करणारा दिव्यांग क्रिकेटपटू विक्रम नागला अटक करण्यात आली आहे. विक्रमला सक्तवसुली संचालनालयाने म्हणजेच 'ईडी'ने अटक केली आहे. यानंतर विक्रमला केंद्रीय तपास यंत्रणेच्या म्हणजेच सीबीआयच्या विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. विक्रमला ७ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे.

भारतीय अंध महिला क्रिकेटपटूंनी इतिहास रचला

विश्व स्पर्धेत सुवर्णपदक

। बर्मिंघम । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला अंध क्रिकेट संघाने इतिहास रचला आहे. आंतरराष्ट्रीय अंध क्रीडा संघटनेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या विश्व स्पर्धेत जबरदस्त कामगिरी करत भारतीय महिला संघाने सुवर्णपदक जिंकलं आहे. अंतिम सामन्यात भारताने ९ गडी राखत ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आणि सुवर्णपदकावर नाव कोरलं. भारत आणि ऑस्ट्रेलियामधील अंतिम सामना बर्मिंघम येथे खेळण्यात आला. या सामन्यात पावसाचा व्यत्यय आला. यानंतर डकवर्थ लुईस नियमामुसार भारतीय संघाला विजयी घोषित करण्यात आले.

महिला संघाने साखळीतील सर्व सामने जिंकले आणि अपराजित राहिला. भारतीय संघाने अंतिम सामन्यात २० षटकामध्ये ११४ धावांवर ऑस्ट्रेलिया संघाला रोखलं होते. ऑस्ट्रेलियाने यादरम्यान ८ गडी गमावले होते. भारताने यानंतर ३.३ षटकामध्ये ४२ धावा केल्या. यानंतर डकवर्थ लुईस नियमामुसार भारताला विजयी घोषित केलं.

गेल्या आठवड्यात हे अंध क्रिकेट संघांचे सामने सुरु झाले होते. यावेळी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पहिला सामना पार पडला. भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान झालेला हा विश्वचषकातील पहिला अंतिम सामना होता. जो भारताने ९ गडी राखत जिंकला.

प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाची सुरुवात फार चांगली झाली नाही. चौथ्या षटकामध्ये त्यांनी पहिला गडी गमावला. यानंतर ऑस्ट्रेलियाने पॉवर-प्लेमध्ये २९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ३९ धावांवर ३ गडी बाद होती. यानंतर सी लुईस आणि वेबेक यांनी ५४ धावांची भागीदारी करत डाव सावरला. पण भारताने पुनरामगन करत ऑस्ट्रेलियाला रोखलं. अखेर ऑस्ट्रेलियाने २० षटकामध्ये ११४ धावा केल्या. भारताने आव्हानाचा पाठलाग करताना जोरदार सुरुवात केली. भारताने फक्त ३.३ षटकामध्येच ४२ धावा ठोकल्या.त्याचबेळी पाऊस आला. यानंतर नियमानुसार भारताला विजयी घोषित केले.

पुरुष अंध संघ उपविजेता

भारतीय अंध पुरुष क्रिकेट संघाला पाकिस्तानकडून ८ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. या पराभवामुळे भारताला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर पाकिस्तानने सुवर्णपदकावर कब्जा केला. भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानसमोर १८५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. व्हीआर ड्युनासोबत पहिल्या सहा षटकांत ५० धावांची भागीदारी करून डीआर टोम्पकीने भारताला चांगली सुरुवात करून दिली. ड्युनाने १८ चेंडूत २० तर टोमपाकीने ५१ चेंडूत ११ चौकारांसह ७६ धावा केल्या. एस रमेशनेही २९ चेंडूत ४८ धावांची नाबाद खेळी खेळून महत्त्वपूर्ण योगदान दिले. १८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तान संघाने १५ व्या षटकातच विजयाची नोंद केली. गोलंदाजीमध्ये टीम इंडियाची कामगिरी अत्यंत निराशाजनक होती. त्यांनी अतिरिक्त म्हणून ४२ धावा खर्च केल्या, ज्यामुळे पाकिस्तानला विजयाची नोंद करणे सोपे झाले.

बॅडमिंटन कोर्टचे उद्घाटन गुरुवारी होणार

(छायाचित्र - आमोघ नाईक)

चित्रलेखा पाटील यांची वचनपूर्ती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बॅडमिंटन खेळातून ग्रामीण भागातील तरुणांचे आरोग्य चांगले राहवे. खेळाडूंना यातून एक चांगले व्यासपीठ मिळावे यासाठी शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने आंबेपूरम ध्ये बॅडमिंटन कोर्ट बांधण्यात आले आहे. कोर्टचा उद्घाटन सोहळा गुरुवारी ० ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा रंगणार आहे.

यावेळी माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, माजी आ.पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, अलिबाग अर्बन बँकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील, जि.प.सभापती चित्रा पाटील, माजी सदस्या भावना पाटील, अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमन पाटील, पं.स.चे माजी सभापती प्रमोद ठाकूर, बाळु पाटील, सुगंधा पाटील, विद्या म्हात्रे, भारती थळे, तालुका चिटणीस अनिल पाटील, माजी उपसभापती प्रकाश पाटील, माजी सदस्य कुंदा गावंड, सुधीर थळे, शेकाप महिला आघाडी प्रमुख प्रिती पाटील, सामाजिक कार्यकर्ते पंकज पंडीत आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील तज्ञ मंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

> बॅडमिंटन कोर्टचा फायदा परिसरातील, खारेपाटातील अनेकांना होणार आहे. यातून एक चांगले खेळाडू घडण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या परिसरात बॅडमिंटन खेळाडूंसाठी हे कोर्ट एक वरदान ठरणार आहे.
> - चित्रलेखा पाटील, महिला आघाडीप्रमुख

कानिकटकरकडे महिला संघ

आशियाई स्पर्धेसाठी लक्ष्मणच प्रशिक्षक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दिग्गज फलंदाज आणि राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण हे आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक असतील, तर भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू ऋषिकेश कानिटकर हे भारतीय महिला क्रिकेट संघाचे अंतरिम मुख्य प्रशिक्षक असतील. २३ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत चीनमधील हांगझोऊ शहरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

व्हीव्हीएस लक्ष्मण सध्या बंगळुरूजवळील अलूर येथे आशिया चषकापूर्वी संघाच्या शिबिरावर देखरेख करत आहे. लक्ष्मण व्यतिरिक्त, आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय पुरुष संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये भारताचे माजी डावखुरा गोलंदाज साईराज बहुतुल हे गोलंदाजी प्रशिक्षक आणि मुनीष बाली क्षेत्ररक्षण प्रशिक्षक असतील. आशियाई क्रीडा स्पर्धेदरम्यान, रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय मालिका आणि विश्वचषक खेळायचा आहे. अशा स्थितीत ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली युवा संघ हँगझोऊला जाणार आहे. राहुल द्रविडच्या अनुपस्थितीत व्हीव्हीएस लक्ष्मणने प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारण्याची ही पहिलीच वेळ नाही. मात्र, आयर्लंड दौऱ्यावर ते संघासोबत गेले नव्हते.

महिला संघासाठी, नवीन मुख्य प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफची नियुक्ती डिसेंबरमध्ये नवीन आंतरराष्ट्रीय देशांतर्गत हंगाम सुरू होईपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे, कानिटकर, भारतीय महिला संघाच्या प्रभारी होते. कानिटकर व्यतिरिक्त, राजीव दत्ता (गोलंदाजी) आणि सुभदीप घोष (क्षेत्ररक्षण) हे महिला संघाच्या सपोर्ट स्टाफचे इतर सदस्य असतील.

पुरुष क्रिकेट संघ : ऋतुराज गायकवाड (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, राहुल त्रिपाठी, टिळक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, आवेश खान, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, शिवम मावी, शिवम दुबे, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक).

राखीव खेळाडू: यश ठाकूर, साई किशोर, व्यंकटेश अय्यर, दीपक हुडा, साई सुदर्शन.

महिला क्रिकेट संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, शफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा, रिचा घोष (यष्टीरक्षक), अमनजोत कौर, देविका वैद्य, अंजली सरवानी, तितस साधू, राजेश्वरी गायकवाड, मिन्नू मणी, कनिका आहुजा, उमा छेत्री (यष्टीरक्षक), अनुषा बरेडी. राखीव खेळाडू: हरलीन देओल, काशवी गौतम, स्नेह राणा, सायका इशाक, पूजा वस्त्राकर.

मांडवा येथे कुस्ती स्पर्धेचे आयोजन

। खारेपाट । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मांडवा येथे नारळी पौर्णिमेच्या दिवशी ३० ऑगस्ट २०२३ रोजी सालाबादप्रमाणे या वर्षीही टाकादेवी स्पोर्ट क्लब व ग्रामस्थ मंडळ मांडवा यांच्या सौजन्याने दुपारी २.३० वाजता राज्यस्तरीय कुस्त्यांचे जंगी सामने मांडवा बंदर येथे आयोजित करण्यात आलेले आहेत.

सदर स्पर्धेत तालुका, जिल्हा व इतर राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील नामांकित पेहेलवान व आखाडे उपस्थित राहणार आहेत. सदर स्पर्धेत रोख रक्कम व आकर्षक बक्षिसे देण्यात येतात. तसेच सदर स्पर्धा पाहण्यासाठी सुमारे वीस ते पंचवीस हजार कुस्ती शौकीन उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेत गुणानुसार एक ते तीन आखाड्यास चषक देण्यात येणार आहेत. सदर स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विधानसभाध्य राहूल नार्वेकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, खा.सुनिल तटकरे, आमदार सर्वश्री जयंत पाटील, आशिष शेलार, बाळाराम पाटील माजी आ.पंडित पाटील, ॲड. आस्वाद पाटील, रणजित राणे, अभिजित राणे, अमित नाईक, राजू सांळुके, शंकरराव म्हात्रे, जयश्री म्हात्रे, राजाभाऊ ठाकूर, प्रविण ठाकूर तसेच जिल्हा व तालुक्यातील विविध स्तरातील मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहे. तरी संपूर्ण रायगड जिल्ह्यातील क्रिडा रसिकांनी सदर स्पर्धेचा लाभ घ्यावा असे मत मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

टाकादेवी स्पोर्ट क्लब व ग्रामस्थ मंडळ मांडवा येथे पारंपारिक किनारा कुस्ती स्पर्धेसाठी व्यासपीठ लोकार्पण व कृतज्ञता सोहळा याचवेळी मांडवा बंदर येथे मान्यवरांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

'सर्वोत्तम संघ निवडा'

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

खेळाडूंची अगोदरच चाचणी घ्यावी, अन्यथा संपूर्ण संघाला अडचणींना सामोरे जावे लागू शकते. प्रत्येक खेळाडूची चाचणी झाली पाहिजे. विश्वचषक अगदी जवळ आला आहे, पण तरीही तुम्ही खेळाडूंना संधी दिली नाही. ते विश्वचषकासाठी गेला आणि जखमी झाला तर? संपूर्ण संघाला याचा त्रास सहन करावा लागेल.यासाठी भारताने एक सर्वोत्तम आणि तंदुरुस्त संघ निवडला पाहिजे, असे स्पष्ट मत ज्येष्ठ क्रिकेटपटू कपिलदेव यांनी मांडले आहे. एका खाजगी वाहिनीवरील कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपली रोखठोक मते मांडली आहेत. किमान इथे त्यांना फलंदाजी किंवा गोलंदाजीची संधी मिळेल आणि त्याला थोडी लय प्राप्त करता येईल. सगळ्यात वाईट म्हणजे त्यांना पुन्हा दुखापत झाली, तर संघाबाहेर राहिलेल्या खेळाडूंसोबत योग्य होणार नाही. पुनरागमन केलेल्या सर्व जखमी खेळाडूंना संधी द्यायला हवी. जर ते तंदुरुस्त असतील, तर ते विश्वचषक खेळू शकतात.असेही त्यानी सुचित केले.

भारतीय रिले संघ अंतिम फेरीत

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या पुरुषांच्या ४४०० रिले संघाने जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपदाच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरून इतिहास रचला आहे.

भारतीय संघाने २ मिनिटे ५९.०५ सेकंदात शर्यत पूर्ण केली, जी कोणत्याही आशियाई संघापेक्षा जास्त होती. भारताच्या संघात मोहम्मद अजमल, राजेश रमेश, अमोज जेकब आणि मोहम्मद अनस याहिया यांचा समावेश होता. भारताने दुसरे स्थान मिळवून प्रथमच पात्रता मिळवली आहे. फक्त अमेरिकेचा संघ भारताच्या पुढे होता. अमेरिकेच्या रिले संघाने २ मिनिटे ५८.४७ सेकंदात शर्यत पूर्ण केली. आणि आता अंतिम सामना रविवारी होणार आहे. या शर्यतीसह भारताचा रिले संघ आशियातील सर्वोत्तम संघ ठरला आहे. आशियाई संघांमध्ये सर्वात वेगवान रिले संघाचा विक्रम जपानच्या नावावर होता, ज्याने २ मिनिटे ५९.५१ सेकंदात शर्यत पूर्ण केली. यापूर्वी, भारताचा विक्रम ३ मिनिटे ००.२५ सेकंदांचा होता, जो २०२० ऑलिम्पिकमध्ये त्याच भारतीय संघाने (मोहम्मद अजमल, राजेश रमेश, अमोज जेकब आणि मोहम्मद अनस याहिया) केला होता.

विश्व बॅडमिंटन स्पर्धेत

सात्त्विकराज आणि चिरागची निराशा

। कोपेन्हेगन । वृत्तसंस्था ।

तयारी तर चोख केली होती; परंतु त्याची अंमलबजावणी आम्हाला योग्यरीत्या करता आली नाही, असे आपल्या पराभवाचे विश्लेषण सात्त्विकराज आणि चिराग शेट्टी यांनी केले आहे. जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपदाची अपेक्षा असलेल्या या भारतीय जोडीचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आले.

गतस्पर्धेत भारताच्या या जोडीने पदक मिळवले होते. यंदाही त्यांच्याकडून पदकाची अपेक्षा होती; परंतु डेन्मार्कच्या किम अस्त्रुप आणि अँड्रिस रासमुसेन यांच्याकडून त्यांचा धक्कादायक पराभव झाला.

जागतिक क्रमवारीत दुहेरीत सध्या दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सात्त्विक आणि चिराग यांनी गतवर्षी ब्राँझपदक जिंकले होते. यंदा उपांत्यपूर्व सामन्यात मात्र ते आपला वेगवान खेळ करू शकले नाहीत. ११ व्या मानांकित असलेल्या डेन्मार्कच्या जोडीकडून त्यांचा दोन

गेममध्येच आणि अवघ्या ४८ मिनिटांत पराभव झाला.

माझ्या मते आमच्याकडून अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली नाही. आम्ही खराब खेळ केला, हे मान्य करावे लागेल; पण आम्ही सहजासहजी हार स्वीकारली नाही. कडवी लढत दिली. मुळात आमची मानसिकता कमी पडली, असे सात्त्विकने सांगितले.

सात्त्विक काही शानदार फटके मारून आव्हान जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करत होता; परंतु चिरागचे खेळावर नियंत्रण नव्हते. बचावात त्याच्याकडून सोप्या चुका होत होत्या. पहिल्या गेमध्ये भारताच्या या जोडीने पिछाडीवरून १५-१५ अशी बरोबरी साधली होती; परंतु मोक्याच्या क्षणी त्यांनी पकड गमावली आणि संधी असतानाही हा गेम गमावला.

चिराग म्हणतो, आम्हाला लय सापडलीच नाही. मी स्वतः क्षमतेनुसार खेळ करू शकलो नाही. खेळात कधी कधी असे घडते एखादा दिवस तुमचा नसतो. प्रयत्न करूनही क्षमतेनुसार खेळ होत नसतो; पण यातूनही शिकता येते, या पराभवापासून आम्ही बोध घेऊन सुधारणा करू.

सात्त्विक आणि चिराग यांनी जून महिन्यात इंडोनेशिया सुपर १००० ही प्रतिष्ठेची स्पर्धा जिंकून मोठी प्रगती केली होती. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या या उपांत्यपूर्व सामन्यात यजमान देशाच्या खेळाडूंना जोरदार पाठिंबा दिला. त्यांच्या नावाचा सातत्याने घोष केला जात होता.

कर्णधार बाबर आझमचे आवाहन

भारत-पाक सामन्याचा आनंद लुटा

। लाहोर । वृत्तसंस्था ।

भारत,पाकिस्तान क्रिकेट संघामध्ये होणारा कोणताही सामना सामना नेहमीच प्रतिस्पर्धी संघासाठी रोमांचक आणि चाहत्यांना आनंद देणारा असतो. दोन्ही संघाच्या खेळाडूंवर सारखाच दबाव असतो. कोणता संघ जिंकेल हे या सामन्याबाबत कोणीच सांगू शकत नाही. त्यामुळे खेळाडू तसेच संपूर्ण जगाने त्याचा आनंद घेतला पाहिजे,असे स्पष्ट मत पाकचा कर्णधार बाबर आझम याने व्यक्त केले आहे.

बाबर पुढे म्हणाले, भारत-पाकिस्तान सामने नेहमीच अटीतटीचे राहिले आहेत. या अतितटीच्या सामन्यांचे संपूर्ण जग आनंद घेते आणि आम्ही पण मैदानात खूप आनंद लुटत असतो. माझ्या मते भारत-पाकिस्तान सामन्यावरून क्रिकेटचा दर्जा खूप चांगला आणि स्पर्धात्मक आहे, हे दिसून येते. भारत-पाकिस्तान ज्या-ज्या वेळी होतो त्याची चाहते आतुरतेने वाट पाहत असतात कारण, दोन्ही संघ नेहमीच १०० टक्के उत्तम प्रदर्शन करताता. नेहमीच प्रतिस्पर्धी संघबरोबर खेळायला मजा येते.असेही त्याने नमूद केले. पाकिस्तानने नुकतीच अफगाणिस्तानविरुद्धची मालिका ३-०ने जिंकली. आता पाकिस्तान जगातील क्रमांक एकचा एक दिवसीय सामन्यातील संघ झाला असून त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे आयसीसी क्रमवारीतील हा क्रमांक घेऊन ते आशिया चषक २०२३मध्ये खेळायला उतरतील. शेवटच्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानने २६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते आणि प्रत्युत्तरात अफगाण संघ २०९ धावांवर गारद झाला.

आशिया चषकाची सुरुवात ३० ऑगस्ट रोजी पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यातील सामन्याने होणार आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ सुपर फोरमध्ये प्रवेश करतील. या टप्प्यातील पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाचे संघ १७ सप्टेंबरला अंतिम सामना खेळतील. ब गटात बांगलादेश, अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. भारताचा अ गटातील पहिला सामना २ सप्टेंबरला पल्लेकेले येथे पाकिस्तानशी होणार असून त्यानंतर ४ सप्टेंबरला त्यांचा नेपाळशी सामना होणार आहे.बाबरच्या या विधानाचे अन्य खेळाडूंनी समर्थनच केलेले आहे. खेळाकडे खेळ म्हणूनच पहावे,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बाबर आझम क्रमवारीत प्रथम

बाबर आझम सध्या एकदिवसीय क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे. त्यामुळे फॉर्ममध्ये असणाऱ्या पाकिस्तान संघाला हरवणे एवढे सोपे होणार नाही. ते नक्कीच ही स्पर्धा जिंकण्याचा प्रयत्न करतील कारण, मागील आवृत्तीत ते अंतिम फेरीत श्रीलंकेकडून पराभूत झाले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)